



# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com
RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026





* वर्ष ६४ वे * अंक ३१ * नांदेड * रविवार, दि. २ फेब्रुवारी २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# आता १२ लाख रूपयांपर्यंत इन्कम टॅक्स नाही

## ▸ केंद्रीय मंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केला अर्थसंकल्प
## ▸ नव्या टॅक्स रिजीममध्ये १० ते ५० लाखांत वर्गवारी



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शनिवारी संसदेत अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पातून सर्वसामान्य लोकांना मोठा दिलासा मिळाला आहे. या अर्थसंकल्पात टॅक्स स्लॅबमध्ये बदल करण्याबाबत अपेक्षा होती, तर ओल्ड टॅक्स रिजीम मधून कर भरणाऱ्यांसाठी काय नियम आणले जाणार याची उत्सुकता देखील होती. या सगळ्याला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. बजेटमध्ये आयकरबाबत अर्थमंत्र्यांनी मोठी घोषणा केली आहे. यासह आरोग्य, शेती, आयटी क्षेत्राबाबतही अनेक निर्णय घेण्यात आले आहेत.

१२ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर लागणार नसल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जाहीर केलं आहे. यामुळे नोकरदार वर्गाला फार मोठा दिलासा मिळाला आहे. १८ लाखांच्या उत्पन्नावर ७० हजारांची सूट आणि २५ लाखांच्या उत्पनावर १ लाख २० हजारांची सूट मिळणार आहे. दरम्यान निर्मला सीतारमण यांनी पुढील आठवड्यात आयकर विधेयक येणार असल्याचं जाहीर केलं आहे. १२ लाखांपर्यंतची सूट फक्त नोकरदार वर्गाला आहे. पण जर या व्यतिरिक्त गुंतवणुकीतून कमाई होत असेल तर त्यांना ही सूट मिळणार नाही. ८० लाख उत्पन्न असल्यास ७० हजार आणि २५ लाख असल्यास १ लाख १० हजारांची कर सवलत मिळेल.

निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्पामध्ये आरोग्य क्षेत्र मजबूत करण्यासंदर्भात अत्यंत महत्वाचे निर्णय जाहीर केले. देशात २०० नवे डे केअर कॅन्सर सेंटर उभारले जातील. ज्यामुळे कॅन्सरसारख्या आजाराशी लढताना नागरिकांना चांगल्या सुविधा मिळू शकतील, असे यावेळी अर्थमंत्री म्हणाल्या. तसेच कस्टम ड्युटीतून ३६ औषध वगळण्यात आली असून कॅन्सरची औषधं स्वस्त होणार आहेत. यासह एससी/एसटी प्रवर्गातील महिलांसाठी एका नव्या योजनेची घोषणा केली आहे. पाच वर्षांसाठीच्या या योजनेअंतर्गत महिलांना मदत मिळणार असून, रूपये १०,००० कोटींचा नवा फंड ऑफ फंड्स तयार करण्यात आला. तसेच एआयसाठी ५०० कोटींच्या निधीची घोषणा करण्यात आली आहे.

### भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणारा अर्थसंकल्प –पंतप्रधान मोदी



अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा प्रत्येक भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा अर्थसंकल्प असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारताच्या विकासाच्या प्रवासातील आजचा दिवस महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या विकासासाठी आजचा अर्थसंकल्प गुंतवणूक आणि बचत वाढवणारा आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

### बंदुकीच्या जखमांवर मलमपट्टी –खा. राहुल गांधी



लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अर्थसंकल्पावर ट्विट करत प्रतिक्रिया दिली आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात, आपल्या आर्थिक संकटाचे निराकरण करण्यासाठी एक आदर्श बदल आवश्यक होता, पण या सरकारची वैचारिक दिवाळखोरी झाल्याचा घणाघात केला आहे. बंदुकीच्या गोळ्यांच्या जखमांवर मलम पट्टी करण्यात आली आहे. जागतिक अनिश्चिततेच्या काळात, आपल्या आर्थिक संकटाचे निराकरण करण्यासाठी एक आदर्श बदल आवश्यक होता, पण हे सरकार विचारांचे दिवाळखोर आहे, अशी प्रतिक्रिया विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी दिली.

### भारताच्या स्वप्नपूर्तीला गतीमान करणारा अर्थसंकल्प –खा. अशोकराव चव्हाण



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला यंदाचा अर्थसंकल्प विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीला गतीमान करणारा आहे. देशातील सर्वच घटकांच्या विकासाला गती व गुंतवणुकीला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पात अनेक उत्तम निर्णय घेण्यात आले आहेत. यामुळे रोजगार निर्मिती होईल, अशी प्रतिक्रिया खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली.

### अपेक्षाभंग करणारा अर्थसंकल्प –खा. प्रा. रविंद्र चव्हाण



अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या वाट्याला काहीच मिळाले नाही. एवढेच नव्हे तर अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राचे नावही घेतले नाही. दुसरीकडे मात्र निवडणुका डोळ्यासमोर ठेवून बिहारसाठी मोठ्या घोषणा करण्यात आल्या. त्यामुळे सर्वसामान्यांच्या अपेक्षा भंग करणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी खा. प्रा. रविंद्र चव्हाण यांनी दिली.

### देशाला आर्थिक महासत्तेच्या दिशेने नेणारा अर्थसंकल्प –आ. प्रतापराव पाटील चिखलीकर



अर्थमंत्री निर्मला सीमारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्प हा शेतकऱ्यांपासून ते नोकरदारांपर्यंत प्रत्येकाला दिलासा देणारा आहे. या अर्थसंकल्पात भारताचा विकास होणार असून महासत्तेच्या दिशेने नेणारा हा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली.

### देशाला पुढे नेणारा हा अर्थसंकल्प –खा. डॉ. अजित गोपछडे



आज अर्थसंकल्प भारताला गतीने पुढे नेणारा आणि प्रगल्भ अर्थव्यवस्थेकडे चाललेला हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प भारताच्या इतिहासात मैलाचा दगड ठरेल.आयकर सवलत १२ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. ही घोषणा भारताच्या अर्थव्यवस्थेत एक मैलाचा दगड ठरेल, अशी प्रतिक्रिया राज्यसभेचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी दिली.

### सर्व घटकांना विकासाची संधी –आ. हेमंत पाटील



यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, उद्योजक, महिला, विद्यार्थी सर्व घटकांना विकासाची संधी देणारा आहे. तर सामान्य माणूस केंद्रस्थानी असलेल्या या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला मोठा विकास निधी मिळाल्याने राज्यातील विकासाला चालना मिळणार आहे, अशी प्रतिक्रिया आ. हेमंत पाटील यांनी दिली.

### भारताला आर्थिक महासत्ता करणारा अर्थसंकल्प –आ. आनंद पाटील बोंढारकर



जागतिक अर्थ सत्तेच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या आणि विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीताराम यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकरी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी भरीव तरतुदी करण्यात आलेल्या आहेत, अशी प्रतिक्रिया आ. आनंद पाटील बोंढारकर यांनी दिली.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नांदेड जिल्ह्यात हदगावमध्ये



**नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दि.२ फेब्रुवारी रोजी सकाळी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. जिल्ह्यातील हदगाव येथील श्रीकृष्ण देव उखळाई मंदिर नवपर्व व कलशारोहण सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत.

नागपूर येथून हेलिकॉप्टरने सकाळी ११.४५ वाजता ते नांदेड जिल्ह्यातील हदगाव येथे थेट हेलिकॉप्टरने पोहोचतील. त्यानंतर दुपारी १२ वाजता हदगाव येथील श्रीकृष्ण देव उखळाई मंदिर नवपर्व व कलशारोहण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी ते मंदिर परिसरात पोहोचतील. मंदिर परिसरातील कार्यक्रम आटपून दुपारी १ वाजता पुन्हा हेलिकॉप्टरने ते नागपूरकडे रवाना होतील.

**(संबंधित वृत्त पान ५ वर)**

## मी कसंतरी निवडून आलो, भाजपवाल्यांनी मला पाडण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले; आ. कल्याणकर यांचा जाहीर आरोप

### महायुतीत ठिणगी



**नांदेड (प्रतिनिधी)–** मी कसंतरी निवडून आलो, भाजपवाल्यांनी मला पाडण्यासाठी पूर्ण प्रयत्न केले, नांदेड जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांनी माझं काम न केल्यामुळे माझं मताधिक्य घटलं असा आरोप नांदेड उत्तरचे शिवसेना आमदार बालाजी कल्याणकर यांनी केला.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत भाजप–शिवसेना शिंदे गट आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीने एकत्र येत महायुती म्हणून निवडणुका लढवल्या. यावेळी महायुतीला अनपेक्षित यश मिळालं असून तब्बल २३७ जागांवर विजय मिळाला आहे. त्यामध्ये, भाजपच्या १३२ तर शिंदेंच्या शिवसेनेचे ५७ आमदार निवडून आले आहेत. पण उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बालाजी कल्याणकर यांनी महायुतीतील घटकपक्षाबाबत नाराजी व्यक्त करत आरोप केले आहेत.

पुढे बोलताना आ. कल्याणकर म्हणाले की, भाजपमध्ये आलेल्या नव्या लोकांनी माझे काम केले नाही. उलट त्यांनी मला पाडण्यासाठी काम केले. ऐवढेच नाही तर माझ्याविरोधात भाजपवाल्यांनी पैसे वाटले. महायुती म्हणून भाजपने सहकार्य करणे आवश्यक आहे, परंतु तसे विधानसभा निवडणुकीत झाले नाही. मला ५० हजारांची लीड मिळणे अपेक्षित असताना केवळ साडेतीन हजारांची लीड मिळाली. त्यामुळे माझा निसटता विजय झाला आहे, अशी नाराजी आ. कल्याणकर यांनी व्यक्त केली.

आगामी काळात नांदेड जिल्ह्यात महायुतीमधला वाद अधिक वाढण्याची शक्यता आहे. तसेच, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही महायुतीत बिघाडी पाहायला मिळण्याची शक्यता दिसून येते.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना ठाकरे गटाने मुंबईत स्वतंत्रपणे निवडणुका लढवणार असल्याचे म्हटले. तर, महायुतीने एकत्रितपणे निवडणुका लढवण्याचा निर्धार केला आहे. याबाबत, महायुतीचे प्रमुख नेते बैठक घेऊन निर्णय जाहीर करतील. मात्र, तत्पूर्वीच स्थानिक स्तरावर महायुतीमधील नाराजी उघड होताना दिसून येते.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ६ फेब्रुवारी रोजी नांदेडमध्ये; आभार यात्रा व जाहीर सभा



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रातील जनतेने महायुतीला भरभरून दिलेल्या आशीर्वादाबद्दल राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार यात्रा सुरू आहे. ही यात्रा गुरुवार, दि.६ फेब्रुवारी रोजी नांदेडच्या नवा मोंढा मैदानावर पोहचणार असून यावेळी जाहीर सभेचे आयोजन केले आहे. त्या सभामंडपाचे भूमिपूजन शनिवारी करण्यात आले.

यावेळी मंत्री दर्जा तथा विधानपरिषद गटनेते आमदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हाप्रमुख गंगाधर बडुरे, जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वनमाला राठोड, गिता पुरोहित, सहसंपर्कप्रमुख स.गुरमिंतसिंघ टमना, उपजिल्हाप्रमुख दत्ता पाटील पांगरीकर, शहरप्रमुख तुलजेश यादव, तालुकाप्रमुख संजय पाटील कुरे, शहरप्रमुख उमेश दिघे, तालुकाप्रमुख बालाजी पाटील, महानगर प्रमुख राजू गुंडावार, महिला आघाडी शहरप्रमुख लक्ष्मीबाई दुधे, शक्ती ठाकूर, बालाजी पाटील भायेगावर, श्याम पाटील वानखेडे, राजु मोरे, मुन्ना राठोड, सुदीन पाटील बागल, कुवरचद यादव, साहेबराव हटकर यांची उपस्थिती होती.

## नांदेड परिक्षेत्रांतर्गत पाच पीआय आणि ११ एपीआयच्या बदल्या; शहाजी उमाप यांनी काढले आदेश



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड परिक्षेत्र नांदेड अंतर्गत विनंती व काहींची प्रशासकीय कारणावरून पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी परीक्षेत्रातील पाच पोलीस निरीक्षक आणि ११ सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात संतोष तांबे आणि एपीआय रवी वाव्हुळे परत नांदेडला तर बाळासाहेब नरवटे यांना लातूरला पाठविण्यात आले आहे.

नांदेड परिक्षेत्र नांदेडअंतर्गत हिंगोली, लातूर, नांदेड आणि परभणी या चार जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र येते. लोकसभा आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकींच्या पार्श्व भूमीवर परिक्षेत्रांतर्गत काही पोलीस निरीक्षक आणि सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. निवडणुका संपल्यानंतर काही प्रशासकीय तर काही विनंतीवरून शहाजी उमाप यांनी शनिवारी परिक्षेत्राअंतर्गत १६ अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यात पाच पोलीस निरीक्षक आणि ११ सहायक पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचा समावेश आहे.

बदल्या झालेल्या पोलीस निरीक्षकांमध्ये संतोष तांबे हिंगोली ते नांदेड, जगदीश मंडलवार परभणी– नांदेड, अनंत भंडे नांदेड– लातूर, प्रेमप्रकाश माकोडे परभणी– हिंगोली, आणि समाधान चवरे नांदेड– लातूर यांचा समावेश आहे.

यासोबतच सहायक पोलीस निरीक्षकांमध्ये रवी वाव्हुळे लातूर– नांदेड, विशाल भोसले हिंगोली– नांदेड, दीपक मस्के नांदेड– हिंगोली, बाळासाहेब नरवटे नांदेड– लातूर, बाळासाहेब डोंगरे नांदेड– लातूर, सुनील गायकवाड नांदेड– लातूर, अनुपमा केंद्रे लातूर– नांदेड, शिवप्रसाद कत्ते लातूर– नांदेड, अनिल काचमांडे हिंगोली– नांदेड, रसूल तांबोळी परभणी– हिंगोली आणि सुधाकर खजे नांदेड– परभणी यांचा बदल्यांमध्ये समावेश आहे.

जिल्ह्याच्या घटक प्रमुखांनी बदल्या झालेल्या सर्व अधिकाऱ्यांना तातडीने बदली झालेल्या ठिकाणी सोडावे व संबंधित अधिकाऱ्याने बदलीच्या ठिकाणी तत्काळ रुजू झाल्याचा अहवाल आपल्या वरिष्ठ कार्यालयाकडून पाठवावा असेही आदेशात नमूद केले आहे.



# नमो सद्गुरू तुकया ज्ञानदीपा...!



हे महामानवा, बा तुकारामा, आपल्या जन्माने महाराष्ट्राच्या समृद्ध विचारप्रवण क्षितिजावर आणखी एक तेजोमय विचारसुर्य उगवला! महाराष्ट्राच्या कणाकणाला प्रतिभेची दिव्यता मिळवून देणारा ज्ञानदीप उजळला! एकावर एक खडतर अनुभवांना सामोरे जातांना आपण स्वतः उजळत आपला भोवताल देदीप्यमान केलात. वारकरी संप्रदायातील आपल्या कृतीशील कार्याने क्रांतिकारी वारकरी संप्रदाय देहूतून इथल्या सामन्यांच्या देहात पुरेपूर उतरला! माणूस माणूस कृतकृत्य झाला. उणेपुरे ४२ वर्षे लाभलेले कार्यशीळ, भजनशीळ आयुष्य! आपले जगणे वर्तमानाला हलवून आणि भविष्यकाळ सुगंधित करून गेले! आयुष्याचे सोने होणे म्हणजे काय? म्हणजेच तुकाराम! यावच्चंद्रदिवाकरौ म्हणजेच तुकाराम!

नमो सद्गुरू तुकया ज्ञानदीपा ।
नमो सद्गुरू सच्चिदानंद रूपा ।।

नमो सद्गुरू भक्तकल्याणमूर्ति ।
नमो सद्गुरू भास्करा पूर्ण कीर्ती ।।

निळोबाराय महाराजांनी तुकोबांना केलेले हे नमन सार्थ आणि आर्त वाटते. स्वतःच्या जगण्याच्या कवितेने लोकांचे जगणे सोपे करणारा हा वेडा कवी, कधी अनंत जन्म-मरणाच्या कविता लिहून गेला(?) ते त्यालाही कळले नाही! एखाद्या कवीच्या कविता विकून आणि त्या गावून अनेकांनी आपले इमले उभे केले, गाड्या-घोड्या घेतल्या! एवढेच काय? केवळ तुकोबांमुळेच अनेकांची लग्ने सुद्धा जुळली! केवढा पुण्यवान तू बापा! किती किती अनमोल शब्दबीज पेरून ठेवलेस! आज आपला जन्मदिवस! इकडे मिडीयावर सगळी वाढदिवसाची धावपळ सुरु असतांना आपल्यावरही दोन शब्द लिहून मनोमन कृतज्ञता व्यक्त करावी त्यासाठी हा शब्द प्रपंच!.

माय-बाप वाचकहो, जगद्गुरू संत तुकारामांना जन्मून आणि आपल्यातून जावून तब्बल पावणे चारशे वर्षे संपत आहेत. त्यांच्या लेखणी आणि चरित्राचा इथल्या समाजमनावर प्रभाव दिवसेंदिवस वाढतच आहे. तुकाराम हा लोककवी म्हणून सर्वच धर्मीय, समाजसुधारक, विचारवंत यांना सर्वकाळ आवडलेला आहे. विशेषतः भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मूकनायक वृत्तपत्राच्या मुखपृष्ठावर तुकोबांचे अभंग लिहून तुकोबांच्या सार्वकालिक लेखणीची कीर्ती वाढविली आहे. भक्ती, प्रेम, जिव्हाळा, प्रतिभा, अभंग, भजन, कीर्तन, सामाजिक सलोखा, स्त्री-पुरुष समानता यासाठी कृतीशील कार्य केले. तुकोबांनी आपला आचार-विचार प्रसारित करतांना

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।
भेदाभेदभ्रम अमंगळ ।।१।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव ।
सुख दुःख जीव भोग पावे ।।३।।

असे रोखठोक अभंग लिहून जातभेद-वर्णभेद याला तिलांजली देण्याचे महत्कार्य आपल्या लेखणीतून केले. सर्वत्र ईश्वर अस्तित्व असून केवळ सत्य हाच देव आहे. कुणाचाही द्वेष, मत्सर न करणे हीच खरी पूजा. अत्यंत म्हत्वाचे म्हणजे आपण सगळे एका देहाच्या अवयवांप्रमाणे एकच असून कोणताही अवयव दुखला तरी वेदना सर्व शरीराला होतात; असे सरळ, सोपे, भेदरहित जगण्याचे जीवनतत्व तुकोबांनी मांडले. खरा वारकरी किंवा भक्त कोण? या प्रश्नांची उत्तरे या अभंगात देतांना कोणती जात श्रेष्ठ, कोणती कनिष्ठ? याचा उल्लेख करतांना

निवडी वेगळे क्षीर आणि पाणी ।
राजहंस दोन्ही वेगळाली ।।३।।
तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे ।
येरा गाबाळाचे काम नाही ।।४।।

असे लिहून वारकरी महाराष्ट्राला तुकोबा सजग करत राहतात. कुणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसून आपल्याला सृष्टीने सर्व गोष्टी समान दिल्या आहेत. जन्मतांना माणसांत कोणताही भेद नसेल तर मग एखादा श्रेष्ठ आणि एखादा कनिष्ठ कसा? आपण सर्व जर एकाच आईची लेकरे असू; तर आपल्यात लहान मोठेपण कसे येईल बरं? इथे जात म्हणजे केवळ माणूस! ज्याप्रमाणे राजहंस पाणी आणि दुध वेगळे कतो त्याप्रमाणे खरा माणूस योग्य-अयोग्य, खरे-खोटे सहज वेगळे करतो, जो केवळ सत्याच्या बाजूने बोलतो तोच खरा माणूस, मग त्याच्या जात-धर्म-पंथ-लिंग इत्यादीचा काहीही संबंध असता कामा नये. याच अनुषंगाने समकालीन कवी संतोष नारायणकर लिहितांना आपल्या दोन पाय दोन हात या कवितेत

अशीच एकदा त्यांनी माझी
विचारली होती जात
मी म्हणालो काय सांगू?
दोन पाय दोन हात

आपल्या सर्वांची विविधतेत एकता सर्वश्रुत करतात. तुकोबांनी मानवी जगण्याचे मूलगामी तत्वज्ञान मांडतांना इथल्या वर्णभेद करणाऱ्या माणसांना सुद्धा जीव लावला. रामेश्वर भटाच्या अंगाचा दाह होत असतांना तुकोबांनी त्यांना भेटून त्यांचा दाह थांबविला, मंबाजी भटाने मारले तरीही तुकोबा त्यांच्या कीर्तनाला जाऊन उभे राहिले. जीवनाचे तत्वज्ञान बोलतांना तसे वर्तन करून दाखवले. संत ज्ञानदेवांच्या पसायदानातील जे खळांची व्यंकटी सांडो उक्तीप्रमाणे खळ न संपवता खळांचा वाकडेपणा, दोष जाण्याची प्रतिज्ञा ज्ञानोबा करतात, त्याच मार्गाने कृतीशील तुकोबा चालत राहतात.

सज्जनहो, आज आपली जबाबदारी वाढली आहे. जगात भारताची संसदीय लोकशाही आपला ठसा उमटवतांना आपल्या राज्यघटनेने आपल्या मुलभूत हक्क, कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्वे घालून दिली आहेत. इथे सर्वाना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. आपण आपला विचार निर्भीडपणे मांडू शकतो. कोणतीही असंवैधानिक भाषा अथवा कृती न करता आपण भारतीय संविधानाने दिलेल्या हक्क आणि अधिकारांचा विनियोग करू शकतो. त्यासाठी आपण सर्वांनीच आपल्या पूर्वज महापुरुषांच्या योगदानाचा, मार्गांचा अवलंब करून हा देश प्रगतीपथा-वर घेऊन जावा लागणार आहे. त्यासाठी मिडियावरील प्रतिक्रिया दुर्लक्षित करून आपण सजग रहावे लागेल. कुणाच्याही चुकीच्या गोष्टींचे समर्थन होता कामा नये, तसेच कुणी हुकुमशाही वृत्ती सुद्धा जोपासता कामा नये. अशी वृत्ती जोपाल्यास समाजमन अस्वस्थ होईल. स्वातंत्र्य धोक्यात येईल. सामान्य माणसाला असुरक्षित वाटायला लागेल. त्यासाठी महामानवांच्या जयंती-पुण्यतिथीला त्यांच्या वैश्विक विचारांची पेरणी सातत्याने करावीच लागेल.


माय-बापहो, आपणाला जगद्गुरू तुकारामांच्या अभंगांची जाणीवपूर्वक दखल घ्यावी लागेल. तुकोबांचा गाथा आपल्यासारख्या संसारीकांसाठी एक अनमोल ठेवा आहे. तुकोबा हे सर्वकाळ पथदर्शी, अलौकिक प्रतिभावंत, लोककवी आपल्या अभंगातून जीवनाला नवनवे आयाम देतात. साडेचार हजाराच्यावर असणारे अभंग आपल्याला वर्तमान परिपेक्षात सजग करतात, सहजतेने जागवून जातात. काळाच्या छातीवर पाय रोवून प्रबोधन करणारे तुकोबाराय आपल्या सर्वांनाच खुणावत असतात. अलीकडे मोबाईल आणि मिडिया संस्कृतीत हरवलेला समाज आणि तरुण जास्तीत जास्त वेळ हातात मोबाईल घेऊन बसलेला असतांना काही वेळासाठी आपण मोबाईल बाजूला ठेवून हातात पुस्तक घ्यावे, तुकोबांचा गाथा घ्यावा. मित्रहो, वाचनाने माणूस समृद्ध होतो. आज वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याची वेळ आली आहे. येणारा काळ आपण मनाने आणि शरीराने मजबूत करून वर्तमानाच्या समोरील खडतर आव्हाने लीलया झेलण्याची क्षमता आपल्यात आणावी लागेल. त्यासाठी आपण क्षणिक किंवा जवळचे न पाहता थोडे मागे पहावे आणि थोडे दूर पहावे. सहजच आपली नजर दृष्टी होऊन ती दूरदृष्टी व्हावी, आणि ते शक्य आहे. त्यासाठी आपण सातत्याने लेखन-वाचनाला आणि त्या अनुषंगाने चिंतनाला बांधून घ्यावे लागेल. महापुरुषांचा हा अनमोल खजाना पुढे न्यावाच लागेल. तेंव्हा चला मित्रहो, तात्कालिक राजकारण बाजूला ठेऊन आज तुकोबांच्या जयंतीदिनी समतेचा, एकोप्याचा धडा घेतांना माणसामाणसातील भेद समूळ संपवतांना केवळ मानवतावादी विचार टिकावा यासाठी प्रयत्न करूया. असे झाल्यास महाराष्ट्राला तुकोबांची जयंती मोठ्या आनंदाने साजरी करण्याचे समाधान लाभल्याशिवाय राहणार नाही. जय तुकोबाराय!

**-प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ
जि. परभणी

# स्त्रीमनात आत्मभान जागवणारी कादंबरी : हिरवं सपान

**पुस्तक परीक्षण**

**प्रा. विठ्ठल बरसमवाड**
खैरकावाडी,
ता. मुखेड, जि. नांदेड




फावल्या वेळेत वाचन करावं म्हणून ग्रंथालयात गेलो; तेथून हिरवं सपान नावाची कादंबरी पुस्तके नह-ळताना हातात पडली व मुखपृष्ठावरून कृषीप्रधान देशाची सुजलाम् सुफलामता कळाली,आणि मी क्षणात ती कादंबरी माझ्या नावावर घेऊन बाहेर पडलो. घरी येऊन ही कादंबरी आधशासारखी वाचून काढलो,या कादंबरीतील पात्रे, काल्पनिक असले तरी वास्तववाशी यांचा संबंध आहे. आजच्या सुशिक्षित स्त्रीमनाच्या अस्तित्वाचा ठाव या कादंबरीत घेतलेला आहे. भारत हा कृषीप्रधान देश म्हणून जगात सर्वत्र ओळखला जातो. शेतीवर जवळजवळ ७५ टक्के समाज अवलंबून आहे.

शेती हा भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा आहे. दुःख,दारिद्र्य, वेदना,दैना,नापीक शेतकऱ्यांची पाठ सोडत नाहीत. या शेतीवर १८ आलुतेदार व १२ बलुतेदार अवलंबून आहेत .बी बियाणे मध्ये भेसळ, वाढलेले बियाणाचे दर पावसाची अनिश्चितता,शेतीमालाला भाव नसणे,यासाठी शेतकरी कर्जबाजारी होऊन हतबल होतो, पिकवलेल्या मालाला योग्य भाव मिळत नाही. पोटासाठी वन वन भटकावे लागते. शेतीत राब राब राबावे लागते,हिरवं सपान पाहणारा शेतकरी आकाशाकडे डोळे लावून बसलेला असतो. शेतकऱ्यांच्या अंत:करणाचा ठाव घेणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीत शेतकऱ्यांच्या अस्तित्वाच्या जगण मरण्याचा, पोटापाण्याचा प्रश्न ध्यानात घेऊन त्याची वास्तववादी चित्रण या कादंबरीत रेखाटलेले आहे. ही कादंबरी शेतकऱ्याच्या आशावादावर अवलंबून आहे. या कादंबरीत शेतकऱ्यांच्या मुलीचा प्रश्न आवर्जून उपस्थित केलेला आहे. परिस्थितीशी अहोरात्र झगडणे, जगण्याची धडपड चालू ठेवणे. सारखे संघर्षमय जीवन जगणे,झालेला अन्याय,अत्याचार सहज सोसणं यावर ही कादंबरी आधारित आहे. ही कादंबरी शेतकऱ्यांची वेदनादायी चित्र समाजासमोर उभे करते.सध्याच्या काळात शेतीचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे. शेतमजुराची व शेतीची कामे करणाऱ्या महिलांची हेटाळणी व दुर्दशा होताना दिसते. म्हणून ही कादंबरी वास्तविकतेला स्पर्श करते.डोळ्या देखत पीक कसे करपून जाते आणि चांगला चाललेला संसाराची राखरांगोळी कशी करते.हे या कांदबरीत वर्णन केले आहे.ही फक्त कादंबरी नव्हे तर शेता मजुराच्या जगण्याची पडझडीचे, खटपटीचे जीवनदर्शन दाखवणारे काल्पनिक पण वास्तवाकडे नेणारी हिरवं सपान कादंबरी आहे.हे नाकारून चालण-ार नाही. ही कादंबरी एका व्यक्तीची किंवा एका कुटुंबाची वास्तव किंवा काल्पनिक नाही तर सार्वजनिक गोर-गरीब, शेतमजूर शेतकरी व तमाम वंचित घटकाचे प्रतिनिधित्व करणारी कादंबरी आहे. ग्रामीण बोली भाषेतून साकारलेली ही कादंबरी आहे. या कादंबरीत अस्सल गा-वरान मेवा ठासून भरला आहे.बाळंतपण,जत्रा, सण उत्सव ,बाजार,लग्न,वावर, पेरणी,खुरपणी, निंदणी,कापणी, खुडणी ,मळणी,कोळपणी हे शब्द आले आहेत. शब्द लेखन करताना लेखकांनी कंजूसपणा अजिबात दाखवला नाही. ग्रामीण भाषेचा गोडवा या कादंबरीतून ओसंडून वाहत आहे.शेतीकडे शासनाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. शेतकरी राजा म्हणून त्याची हेटाळणी केली जात आहे. समाजामध्ये शेतीबद्दल उदासीनता निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांना छळणारा सावकार अमृत महोत्सवी वर्षात ही तसाच उभी आहे. या सर्वांचे वर्णन लेखकाने अतिशय शांत डोक्याने हिरवं सपान कादंबरी मध्ये चित्रित केले आहे. म्हणून ही कादंबरी प्रत्येकाने वाचन करून संग्रही ठेवावी. इतकी सकस, सुंदर दर्जेदार आहे. यात शंका नाही.

**लेखक: डॉ.विलास धनवे**
**प्रकाशक :श्री अशोक मुळे**
**डिंपल पब्लिकेशन**
**१०४,वायकिकी अपार्टमेंट**
**आनंदनगर. बियन चव्हाण मार्ग,**
**नवघर वसई रोड स्टेशन (प.रेल्वे)**
**जि. पालघर ४०१२०२.**
**मुद्रक: प्रिंट वन ग्राफिक्स**
**नवी मुंबई**
**मुखपृष्ठ :चित्रकार सरदार**
**जाधव मूल्य;, ३०० रुपये पृष्ठ**
**संख्या; २०४**

## वसंत पंचमी

वसंत,ग्रीष्म,वर्षा,शरद
हेंमतात रुजे अंकुर
शिशिराची सरता पानगळ
प्रेम ऋतु होतो आधिर
पिंपळपानी कोकीळ स्वर
पानो पानी पूष्प बहर
दरवळते शुभ्र शेवंती
धुक्याची पांघरुन चादर
वसंत ऋतुची येता चाहुल
रतीकामदेव प्रणयातुर
गुलाबी ऋतु बावरतांना
झंकारती धुक्याचे नुपुर
चराचरात नवचैतन्य
वसंत म्हणजे जीवनगाणे
रुपसौंदर्यांचा लेवून साज
फुलांतही उमलते चांदणे

**-रूपाली वागरे/वैद्य**
नांदेड
मो.९८६०२७६२४१

# नवीन नांदेड भागातील युवा नेतृत्व - गजानन कते



सामाजिक कार्यकर्ते तथा नवीन नांदेड भागातील धार्मिक, सामाजिक कार्यासाठी सदैव अग्रेसर असलेले नेतृत्व म्हणून गजानन कते. त्यांच्या कार्याची महत्ती आता सर्वदूर पसरत आहे हे त्यांनी केलेल्या कार्यातून पहावयास मिळते.

सामाजिक कार्यकर्ते गजानन कते यांचा २ फेब्रुवारी वाढदिवस. त्यानिमित्त एक सच्चा मित्र म्हणून त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. नवीन नांदेड भागात गजानन माधवराव कते या नावाने सर्वसामान्य नागरिकांपासून ते युवकांपर्यंत परिचित. युवा शक्ती मित्र मंडळाच्या माध्यमातून सिडको-हडको परिसरातील विविध गावांत संस्थापक अध्यक्ष संजय पाटील घोगरे यांच्या खांद्याला खांदा लावून शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक कार्यासाठी सदैव अग्रेसर राहुन त्यांनी उल्लेखनीय कामे केली आहेत.

२६ जानेवारी प्रजा-सत्ताक दिनानिमित्त युवा शक्ती मित्र मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात सहभाग होऊन अनेक रक्तदाते वाढविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. तर गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त हडको-सिडको भागातील मंदिरात महाअभिषेक व महाप्रसाद माध्यमातून भक्तांसाठी सदैव प्रयत्नशील राहिले आहेत तर शैक्षणिक कार्यासाठी संजय पाटील घोगरे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण व शहरी भागातील हजारो गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना परीक्षा पॅडचे वाटप करण्यात आले तर सामाजिक बांधिलकी जोपासत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक महापुरुषांच्या जयंतीसाठी पुढाकार घेतात. तर गणेशोत्सव काळात विविध भागा-तील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांना सहकार्य करतात. तसेच नवरात्र महोत्सवामध्येही त्यांचा सक्रिय सहभाग असतो.

हडको परिसरातील विविध विकासात्मक कामांसाठी पुढाकार घेऊन अनेक ठिकाणी त्यांनी प्रयत्न केले आहेत, तर नागरी सुविधा मिळवण्या- साठी वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. जनसेवेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी कामे केली आहे. सामाजिक कार्याच्या माध्यमातून पाणी पुरवठा, साफसफाई, मलः निस्सारण दिवाबत्ती यासह अनेक समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

आगामी होणाऱ्या महा-नगरपालिका निवडणूक अनुषंगाने कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव निवडणूक लढविण्याची शक्यता असून, जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध असलेल्या या युवा नेत्याला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.

**मंगेश कदम**
सिडको, नवीन नांदेड

# पालकत्व समजून घेताना...

समाजात घडणाऱ्या घडा-मोडींचा केवळ समाजावर नाही तर समाजमनावर दूरगामी परिणाम होत असतात. नांदेड शहरात जानेवारी २०२५ मध्ये घडलेल्या एका घटनेने माझेही मन सुन्न झाले खरे तर ती मन हे लावून टाकणारी तुम्हा आम्हाला सर्वांना पालक या नात्याने असंख्य प्रश्न विचारणारी घटना आहे. मी पालकत्व हा शब्दप्रयोग केवळ जैविक म्हणजेच जन्मदाते याविषयी येथे वापरलेला नाही. तर शिक्षक, समाज, समाजातील प्रत्येक सुजान नागरिकांसाठी वापरलेला आहे.

आज खरे पाहता बालके आपल्या देशाचे भविष्य असतात, आम्ही त्यांच्यात आमच्या देशाचे, राज्याचे, विभागाचे, जिल्ह्याचे, तालुक्याचे, गावाचे, कुटुंबाचे, समाजाचे भविष्य पाहत असतो मग त्यांच्या जडणघडणीत का कुचराई करतो? हेच समजत नाही. आज माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या युगात भारत जागतिक महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो आणि प्रत्यक्षात भारतीय समाजात घडणाऱ्या घडामोडींचा जेव्हा लेखाजोखा पाहतो तेव्हा वाटते नेमके आपण कोठे आहोत? काय करत आहोत? कोणत्या घटना घडत आहेत? या प्रश्नांची उत्तरे आमच्या समाजाची वास्तविकता बयान करत असतात.

Socialization म्हणजेच सामाजिकरणाची प्रक्रिया प्रत्येक समाजाचा अविभाज्य घटक आहे. सामाजिकरणाद्वारे एका हाडामासाच्या गोळ्यास सुंदर आकार दिला जातो. सामाजिकरण प्रक्रियेच्या माध्यमातून बालमनावर वेगवेगळ्या बाबी बिंबवल्या जातात आणि सुयोग्य नागरिकांची निर्मिती होत असते म्हणून सुयोग्य पालकत्वाची भूमिका पार पाडताना वर सांगितलेल्या प्रत्येक घटकांनी बालकावर कळत नकळत अनेक चांगल्या बाबी बिंबवल्या पाहिजेत. मग ते कधी औपचारिक पद्धतीने असेल तर कधी अनौपचारिक पद्धतीने असेल कारण यातून बालकांना चांगले वाईट याची जाणीव निमर्ण होते. त्याचबरोबर वाईट घटनांमुळे होणाऱ्या परिणामांचीही जाणीव मुलांना होते. मूल जन्माला घालणं खूप सोपे आहे, पण त्यास योग्य पद्धतीने घडवणे एक तारेवरची कसरत आहे. आजच्या आधुनिकता आणि पाश्चिमत्ती करण्याचा प्रभाव पडलेल्या भारतीय समाजात बालकांच्या चुका अयोग्य पालकत्व, चुकीची संगत, समाजाचा बालकांकडे बघण्याचा संकुचित दृष्टीकोन आणि आजूबाजूचे वातावरण यामुळे मोठ्या प्रमाणात होत आहेत म्हणून पालकत्व समजून घेणे खूप



आवश्यक आहे. आज-काल एकमेकांचे बघून प्रत्येक जण (स्त्री- पुरुष) चुकीच्या पद्धतीने आधुनिकीकरणाचे अंधानुकरण करत आहेत आणि हेच वर्तन मुले अनुकरणातून करतात आणि आम्ही मुलांना दोष देऊन मोकळे होतो

आम्ही मोठी माणसे मुलांच्या वर्तनाविषयी कधीच अभ्यास करत नाही. त्यामुळे मुले वारंवार नको त्या चुका मोठ्या प्रमाणात करताना आढळून येतात. त्यामुळे आपण मुलांच्या प्रत्येक वर्तनाचा चांगला- वाईट अभ्यास करणे गरजेचे आहे आणि त्यातून त्याचे निदान आपणास तात्काळ प्राथमिक स्तरावर करणे शक्य होते, परंतु अशी कृती मला तर फारशी पालकांकडून होताना आढळत नाही. त्यामुळे मुले चुकीच्या मार्गाला जात आहेत.

पालकत्वाची सर्वात महत्वपूर्ण भूमिका कोणाची असेल तर ती आहे आईची. आजची आई आधुनिक झाली. ती वेगवेगळ्या क्षेत्रात भराऱ्या घेत आहे, पण तिला तिच्या आईपणाचा आज विसर पडलेला आहे. बालकास गोंजारणे, त्याचे लाड करणे, त्याच्या समस्या जाणून घेणे, त्यास वेळ देणे यासाठी तिला वेळच नाही. त्यामुळे बालकांना येथे प्रेमाचा, आपुलकीचा अभाव आढळून आल्याने ते प्रेम, आपुलकी बाहेर शोधतात आणि शोधताना त्यांच्या हातून चुका होतात हे आजच्या आईने समजून घेतले पाहिजे. आय्यानों करियर करा, परंतु तुमच्या कुटुंबाचे करिअर तुमची मुले आहेत हे विसरू नका. आजच्या आईस फॅशन, नटने- मुरडणे, कीटी पार्टी, मित्र-मैत्रिणी यासारख्या अनेक बाबींना वेळ आहे, परंतु मुलांना समजून घ्यायला तिला वेळच नाही. मग त्यांच्या तक्रारी सुरू होतात. मुले ऐकतच नाहीत, पण तुम्ही कधी मुलांना ऐकत नसताना प्रेम, धाक, आपुलकीचा वापर केला आहे का? हा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा त्याची उत्तरे नाही अशीच येतात. त्यामुळे मुले स्वतःच्या आईपासून दूर तर जातात. त्याचबरोबर अनेक चुकीची कामेही करत आहेत, म्हणून केव्हा केवळ मुलांना जन्म घालण्याचा आपणास जसा हक्क आहे तसे कर्तव्यही पार पाडले पाहिजे. आजच्या आईने पुन्हा एकदा छत्रपती शिवरायांच्या कालखंडातील राष्ट्रमाता जिजाऊ आणि हिरकणीची भूमिका घेणे गरजेचे आहे.

पालक म्हणून आम्ही मुलांसमोर कशा प्रकारचे वर्तन करतो हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आजच्या आधुनिक युगातील मॉडर्न पालक मुलांसमोरच एकमेकांच्या गळ्यात गळे घालणे, प्रेम करणे, विचित्र पोशाख करणे, खोटे बोलणे यासारख्या कृती करत आहेत आणि कोवळ्या बालमनावर अवेळी नको त्या गोष्टी गिरवल्या जात आहेत आणि मुलांकडून नको त्या कृती मोठ्या प्रमाणात घडत आहेत. आम्हाला आमचा समाज वरवर पाहता खूप सुंदर, पुढारलेला, प्रगतीची टोक गाठलेला दिसतो, पण समाजा-तील भयाण वास्तवाचे दर्शन आपणास होत नाही त्यामुळे यापासून अनभिज्ञ आपण असतो आणि समाजाच्या प्रगतीच्या गप्पा मारताना दिसतो परंतु पालकांनो, सावधान! आपले भविष्य सांभाळा त्याला प्रेमाने आलिंगन देऊन, सामंजस्याने हाताळा जेणेकरून तुमची आमची सर्व समाजाची मुले बिंधास्त समाजात वावरू शकतील आणि त्यांच्या वाढ विकासाला चालना मिळेल.

पालकत्वांमध्ये मोडणारा सर्वात महत्त्वाचा घटक आणखीन एक खूप महत्वपूर्ण ठरतो तो आहे शिक्षक. भारतीय परंपरेनुसार गुरु हा व्यक्तीच्या आयुष्यातील सर्वात महत्त्वपूर्ण घटक आहे. शिक्षकांनी बालमनावर संस्कार करताना ते केवळ ते माझे मूल आहे याचे भान ठेवून कार्य केले तर नक्कीच मुलांची चुकीची दिशेने जाणारी पावले आपण रोखू शकतो. परंतु आज असे होताना दिसून येत नाही. जाऊ द्या ते खूपच आगाव आहेत, खोड्या करतात, वर्गामध्ये फार त्रास देतात, बरे झाले त्यांच्यासोबत असेच व्हायला पाहिजे होते असे उद्गार शिक्षकाकडून बालकांविषयी निघतात हे फार चुकीचे आहे. खरे तर बालकाच्या आयुष्याचा डॉक्टर म्हणून शिक्षकांनो तुमची भूमिका येथे फार महत्त्वाची आहे. मुलांना समजून घ्या, त्यांचे प्रश्न सोडवा, त्यांच्या क्षमता सत्कर्माकडे वळवा, मुले तुम्हाला सलाम ठोकतील, पण समाजात असे शिक्षक क्वचित आढळतात आणि मुलांच्या हातून चुकीची कृती होत जाते.

शेवटी एवढेच म्हण, सर्वकांही थांबवता येते, त्याचे समूळ उच्चाटन करता येते, फक्त मनाची तयारी असावी लागते.

जानेवारी २०२५ मध्ये एका बालकाचा गे-लेला बळी आणि इतर बालकाचे अंधकारमय भविष्य समाज म्हणून आपणास रोखता आले असते पण आपण घेत असलेली बघ्याची भूमिका जाऊदे ना, आपल्याला काय करायचे, मरू दे हे आमचे वर्तन या समस्यांना खतपाणी घालत आहे. संवेदनशील पालकत्व, समाज बालकांना भविष्यात योग्य दिशा दाखवू शकतो. प्रयोग करून बघा, नक्कीच प्रत्येकाला यातून आनंद मिळेल आणि निर्माण होणाऱ्या समाजातील बालकांचा छळ, बालकामगार समस्या, बालगुन्हेगारी, बालकांची व्यसनाधीनता, एकटेपणा, न्यूनगंडाची भावना यासारखे प्रश्न तुम्हा-आम्हाला सोडवता येतील. चला तर भारताच्या भविष्याला योग्य दिशा देण्यासाठी सज्ज होऊया आणि पुन्हा जुन्या पद्धतीने बालकांवर संस्कार देऊन, एक सुरक्षित वाता-वरणाची निर्मिती करून बालमन अबाधित करूया.

**-डॉ. सत्यभामा जाधव**
बालकल्याण समिती सदस्य
नांदेड
मो. ९४०३७३४७१५

## थोडक्यात...

### जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यात १ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १ फेब्रुवारी ते १७ फेब्रुवारीपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहिल. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

### क्षितिजा साधू चित्रकलेत नांदेड जिल्ह्यात पाचवी

**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** अभिनव चित्र शाळा नांदेड तर्फे घेण्यात आलेल्या आरंभ परीक्षेत इंदिरा गांधी हायस्कूल हडकोची वर्ग पाचवीची विद्यार्थिनी क्षितिजा संतोष साधू हिला उतेजनार्थ बक्षीस मिळाले आहे. नांदेड जिल्ह्यात आरंभ परीक्षेला १२४५ विद्यार्थी बसले होते. त्यामधून तिचा पाचवा क्रमांक आला. मुख्याध्यापक जी. एम. शिंदे, पर्यवेक्षक गोगुळवाळे, मुख्याध्यापिका शिंदे यांच्या हस्ते सन्मान चिन्न व प्रमाणपत्र देण्यात आले. क्षितिजाच्या यशाबद्दल तिचे सर्वांनी कौतुक केले उर्वरित विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र पर्यवेक्षक गोकुळवाले व शिक्षक कल्याणकर यांच्या हस्ते दि. २८ जानेवारी रोजी देण्यात आले. यामध्ये आरंभ परीक्षेला ३६ तर बोध परीक्षेला ८ विद्यार्थी बसले होते. सर्वच ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# भोकरच्या हाश्मीनगरात घाणीचे साम्राज्य

## नगरपालिकेचे समस्यांकडे दुर्लक्ष; बेशरमाची झाडे लावून नपचा करणार निषेध



**भोकर (प्रतिनिधी) –** शहरातील हाश्मी नगर भागात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सर्वत्र नाल्या तुंबून घाण पाणी साचल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. नागरिकांनी वारंवार मागणी करूनही नगरपरिषदेच्यावतीने कायमच हाश्मीनगरमधील सुविधांकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे बेशरमाचे झाडे लावून नगरपरिषदेच्या कार्यपद्धतीचा निषेध व्यक्त करण्यात येणार आहे. याबाबतचे निवेदन उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक नगर परिषद भोकर यांच्याकडे देण्यात आले आहे.

भोकर नगर परिषदेच्या हद्दीत येणाऱ्या बटाळा रोड लगत असलेल्या वार्ड क्रमांक ३ मधील हाश्मी नगरातील काही भागात पक्के रस्ते व पक्या नाल्या नसल्याकारणाने येथील सर्व घरातील शौचालय व सांडपाणी रस्त्यावर येत आहे. पाण्यामुळे रस्त्यांस तळ्याचे व गटारगंगाचे स्वरूप आले आहे. या गटारगंगेमुळे रस्त्याने पायी प्रवास करणाऱ्या शालेय विद्यार्थी, महिलांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे व घाणीच्या साम्राज्यामुळे डासांचा मोठा प्रादुर्भाव झाला असून परिणामी परिसरात अनेक बालके मलेरिया, डेंगू सारख्यारोगाने ग्रासले आहेत. या समस्या सोडवण्या बाबत हाश्मी नगर वासियांकडून नगर पालिकेचे मुख्याधिकारी ऋषभ पवार तसेच नपा कार्यालयातील संबधित विभागाकडे वारंवार विनंती करूनही नगर पालिकेने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. या समस्येबाबत नगर पालिकेकडून वारंवार टाळाटाळ करण्यात येत असून नगरवासियांना उडवा उडवीचे उत्तरे मिळत आहेत.

या नगरातील समस्येची तात्काळ दखल घेऊन या ठिकाणी सीसी रोड, बंदिस्त नालीचे तात्काळ बांधकाम करण्यात यावे व पक्के रस्ते, नाल्या होईपर्यंत यावर तत्काळची उपायोजना करून नगरवासीयांना होणारा नाहक त्रास दूर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मागण्या मान्य न झाल्यास हाश्मी नगर वसियांकडून या गटारगंगेत बेशरमाची झाडे लावून निषेध व्यक्त केला जाणार आहे. याबाबत उपविभागीय अधिकारी तथा प्रशासक नगरपरिषद भोकर यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे.

या निवेदनावर शेख नूरजहा शेख रहेमत, नाहेदा बेगम साजिद अली, फरजाना बेगम मोहम्मद यासीन, अलीमाबेगम शेख फरीद, बिस्मिल्ला बेगम शेख चाऊस, जरीनाबेगम बाबूमिया, तब्बसुम बेगम अफरोज, शेख रजिया शेख मुनीर, सुलतानाबेगम शेख मुस्ताक, मुस्कानबेगम अख्तर, सानियाबेगम सद्दाम, सुलतानाबेगम शेख फेरोज, रईसा बेगम शेख अरेफ, शेख मुस्ताक शेख रहेमत, शेख अनवर शेख मुनीर, शेख फरीद शेख अब्दुल, शेख बाबूमिया शेख पीरसाब, जाकेर पठाण, शेख अफरोज अमीरसाब, शेख मोईन शेख यासीन, शेख साजिद अली खान, जावेद बागवान, अन्सार कुरेशी, शेख गौस गफुरमिया, शेख आयुब शेख पीरसाब, शेख समीर शेख सरवर, अरेफ खान पठाण यांच्यासह हाश्मी नगरमधील अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# असरजन येथे ३१ जानेवारीपासून अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** असरजन येथे ३१ जानेवारीपासून अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद भागवत कथा, गाथा पारायण सुरु आहे. तसेच श्री खंडोबा व श्री महादेव मुर्ती व कळशारोहण सोहळा व लक्ष्मण शक्तीचा कार्यक्रम होत आहे. दि. ७ फेब्रुवारी रोजी हभप राम महाराज सुगावकर यांच्या कीर्तनाने व व महाप्रसादाने सप्ताहाचा समारोप होणार आहे.

तालुक्यातील असर्जन येथे श्री विठ्ठल रुक्मीणी मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन सोहळा व श्री खंडोबा व श्री महादेव मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशारोहण सोहळ्या निमित्त गुरुवर्य आनंदगीर महाराज, कै.आनंद भारती महाराज असर्जनकर, के.भगवान महाराज असर्जनकर, गुरुवर्य दत्तगीर महाराज मठसंस्थान असर्जन, श्री. ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पावडेवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे.

३१ जानेवारी दुपारी भागवत कथेला सुरुवात झाली. भागवताचार्य हभप पुनम दिदी गिरी आळंदीकर यांच्या समुधर वाणीतून भावार्थ रामायणाचे श्रवण करण्यात येत आहे. श्री गाथा पारायण व्यासपीठ नेतृत्व श्री ह.भ.प.भाऊसाहेब महाराज पावडेवाडीकर, हभप गंगाधर महाराज बोराळकर, हभप परमेश्वर महाराज कंधारकर, हभप वैष्णवी ताई गौड सोनखेडकर, हभप राम महाराज सुगावकर, हभप राधाताई पांचाळ आव्हाईकर यांच्या कीर्तनाने लक्ष्मण शक्ती सोहळ्यास सुरूवात झाली. ७ फेब्रुवारी रोजी हभप आनंदराव पाटील वळशिंगे हरबळकर यांच्या काल्याचे किर्तन व महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात दैनंदिन कार्याक्रमात पहाटे काकडा भजन, सकाळी गात राम भारती महाराज मोहनपुरा व संत दतागिर महाराज असरजनकर, संत समगिर महाराज उपस्थित राहणार आहेत. या सप्ताहाला भक्तांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन असर्जन येथील समस्त गावकरी मंडळी आणि वीर शिवबा नवयुवक मित्रमंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्हा पोलीस दलातील १२ जण सेवानिवृत्त



**नांदेड (प्रतिनिधी) –** जिल्हा पोलीस दलातील दोन उपनिरीक्षक, चार श्रेणी पोलीस उपनिरीक्षक, चार सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आणि दोन पोलीस अंमलदार असे १२ जण सेवानिवृत्ती झाले आहेत. पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) डॉ. अश्विनी जगताप यांच्या हस्ते त्यांना निरोप देण्यात आला.

पोलीस उपनिरिक्षक रमेश गिरी (पोलीस ठाणे सिंदखेड), शेख आयुब शेख इमामसाब (नियंत्रण कक्ष नांदेड), श्रेणी पोलीस उपनिरिक्षक चाँद पाशा नुरपॉशा सय्यद (पोलीस ठाणे किनवट), केशव राठोड (पोलीस ठाणे, भोकर), रामचंदर दराडे (पोलीस ठाणे, माहूर), शिवाजी वड (अर्धापूर), सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक नागोराव आत्राम (माहूर), आनंद कंधारे (वजिराबाद), विनायक बाबर (कंधार), यशवंत जाधव (इतवारा), पोलीस अंमलदार अनिलकुमार लाठकर (सोनखेड), पंडीत कदम (पोलीस ठाणे इतवाराा) यांना दि. ३१ रोजी मंथन सभागृहात सहकुटूंब सन्मान करून पोलीस उपअधिक्षक डॉ. अश्विनी जगताप यांनी निरोप दिला. यावेळी पोलीस निरीक्षक नामदेव रिठे, पोलीस उपनिरीक्षक माया भोसले, पोलीस अंमलदार सविता भिमलवाड यांची उपस्थिती होती.

# लोह्यातील श्रीमती आर. जी. वैराळे मल्टीस्टेट को - ऑप क्रेडिट सोसायटीत करोडोंच्या घोटाळ्याची आठ पिग्मी प्रतिनिधींची पोलीस अधिक्षकांकडे तक्रार



**लोहा (प्रतिनिधी) –** येथील श्रीमती आर. जी. वैराळे मल्टीस्टेट को.ऑप. क्रेडीट सोसायटीमध्ये एक कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची तक्रार ८ पिग्मी एजंटांनी पोलीस अधिक्षक नांदेड यांच्याकडे दिली आहे. पोलीस अधिक्षकांना ही तक्रार लोहा पोलीस ठाण्यात वर्ग केली आहे.

लोहा येथे श्रीमती आर. जी. वैराळे मल्टीस्टेट को. ऑप. क्रेडीट सोसायटीचे पिग्मी एजंट सचिन भानुदास मुडसे, मंगेश मारोती वंजारे, शेख सिकदर शेख बाबु, हनमंत मनोहर कागणे, गोविंद हरीभाऊ पवार, अनिल किशनराव वट्टमवार यांनी सोसायचीच्या निर्देशानुसार शहरासर तालुक्यातील अनेक सदस्य सोसायटीशी जोडले. पण त्यांना मिळणारा कमिशनचा भाग आणि गुंतवणुकदारांना मिळण्याचा हक्क मिळत नव्हता. एजन्टला कमिशनपेक्षा २ टक्के जास्त कमीशन देवू तसेच खातेदारांना अर्थात गुंतवणूकदारांना १२ टक्केऐवजी १५ ते १८ टक्के परतावा देण्याचे आमीष देण्यात आले होते. परंतु सोसायटीकडून फसवणूक झाल्याचे लक्षात येताच सोसायटीचे अध्यक्ष अमोल बाजीराव ढगे, सचिव गजानन उत्तमराव शिंदे, उपाध्यक्ष मनोजकुमार श्रावण दिवेकर, लोहा शाखाचे अध्यक्ष सुनिल भानुदास मैड, सदस्य गौतम गुणाजीराव वैराळे, आत्माराम रामजी मानुरकर, त्र्यंबक हनमंतराव पाटील, दत्ताहरी बाबाराव कदम, हिरामण दशरथ घोरबांड, ऐश्वर्या अमोल ढगे, लताबाई बालाजी ढगे आणि विनोदकुमार बद्रीनारायण धुत यांच्याकडे अनेक वेळा फसवणुकीची तक्रार करण्यात आली. पण या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांपैकी कोणीच प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे पिग्मी एजंट सचिन भानुदास मुडसे, मंगेश मारोती वंजारे, शेख सिकदर शेख बाबु, हनमंत मनोहर कागणे, गोविंद हरीभाऊ पवार, अनिल किशनराव वट्टमवार यांनी पोलीस अधिक्षकांकडे धाव घेवून सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यासाठी निवेदन देण्यात आले. या अर्जाचा तपास करण्यासाठी हा अर्ज लोहा पोलीस ठाण्याकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती यावेळी अर्जदारांनी दिली.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात हुतात्म्यांना आदरांजली



**नवीन नांदेड (प्रतिनिधी) –** वसंतराव नाईक महाविद्यालयात राष्ट्रपीता म. गांधी यांची पुण्यतिथी आणि हुतात्मा दिना निमित्त अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार तर उपप्राचार्य डॉ. व्ही. आर. राठोड, कार्यालयीन अधीक्षक श्री आर. डी. राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.व्यंकटेश देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी प्रो.डॉ.रेणुका मोरे, डॉ. कांगणे आर. एम., डॉ.सतिश शेटे, डॉ. जी. वेणुगोपाल, प्रो. डॉ नागेश कांबळे, डॉ. साहेबराव शिंदे, डॉ. गणेश लिंगमपल्ले डॉ.साहेबराव मोरे, डॉ. विजयकुमार मोरे, डॉ संजय गिरे, डॉ. शशीकांत हटकर, डॉ. गणेश ईजळकर, डॉ.राहुल सरोदे प्रा. डॉ. डोंगरे, प्रा. डॉ. जगताप ए. आर. यांसह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण सोहळा संपन्न

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवाजी विद्यालयात दि. २९ जानेवारी रोजी स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. या स्नेहसंमेलनात चिमुकल्यांना विविध कलागुणांचे सादरीकरण केले. त्यानंतर विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

सौ. सरस्वती आनंदराव बोंढारकर (तिडके) यांच्या हस्ते स्नेहसंमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सामुहिक व वैयक्तिक नृत्य सादर केले. अध्यक्षस्थानी जिल्हाप्रमुख विनय गिरडे, उद्घाटक युवाशक्ती मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय घोगरे, अर्धापूर नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी सभापती लक्ष्मणराव जाधव, संस्थेचे



अध्यक्ष संतोष महागावे सचिव राजेश महागावे, सहसचिव सारिकाताई महागावे, सदस्य डॉ. विनाताई लोमटे, रवी लोमटे, सोनाली पतंगराव, डिगा पाटील, बापूसाहेब पाटील, सारंग नेरलकर, प्राध्यापक गंदगे, सोनवळे, मुख्याध्यापक जाधव, डॉ. राजकुमार वलेकर, पठाण पारडे, पोवळे, घोगरे, मुख्याध्यापक बि. डी. पवार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद विद्यार्थी पालकांची उपस्थिती होती.

प्रारंभी कै.गंगाधर महागावे, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पवार यांनी प्रास्ताविक करून सूत्रसंचालन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना बक्षीस वितरित करण्यात आले. या कार्यक्रमात बालगीते, देशभक्तीपर गीते, लावण्या, लोकगीते, हिंदी गाणे सादर करण्यात आले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख ढवळे, श्रीमती मिरकुटे संस्थेच्या सहसचिव श्रीमती सारिका शाळेतील सहशिक्षक पांडागळे नांगरे, श्रीमती टेंगेटोल, लिपिक मगर, श्रीमती डांगे, श्रीमती भोसले, आनंद निरडे यांनी परिश्रम घेतले.

# सांगवीच्या श्री संत मन्मथ माध्यमिक स्वामी विद्यालयात स्वयंशासन दिन उत्साहात



**नांदेड (प्रतिनिधी) –** मुखेड तालुक्यातील सांगवी बे. येथील श्री संत मन्मथ स्वामी माध्यमिक विद्यालयात दि.२७ जानेवारी रोजी स्वंयशासन दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनीच शाळेचे व्यवस्थापन केले. मुख्याध्यापक, शिक्षक, सेवक अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पेलल्या.

मुख्याध्यापक म्हणून शिवप्रसाद कपाळे यांनी काम पाहिले तर शिक्षक म्हणून ओमकार चव्हाण, नागेश कडमपल्ले, मारोती गुट्टे, सुरज मुंडे, एकनाथ मुंडे, शिवम आगलावे, नंदनी कपाळे, वैष्णवी भालके, शताक्षी मठपती, नंदनी बंडरे, अंजली जाधव, नम्रता गुट्टे, सुप्रिया मस्कले, धनश्री मस्कले, पूजा राठोड, महेश्वरी होनशेट्टे, पल्लवी डावकरे, भाग्यश्री डावकरे, ऋतुजा डोंगळे, सरस्वती धनवाडे, चांगुना तेलंग यांनी काम पाहिले. सेवक म्हणून अजय पवार, पांडुरंग बलुरे, कुलदिप कांबळे यांनी काम केले. यावेळी मुख्याध्यापक एम. आर. मोमिण यांच्यासह शिक्षक, शिक्षिका उपस्थित होत्या.

# रासेयो शिबिरातून संस्काराची शिदोरी मिळते –पोनि बिर्ला



**किनवट (प्रतिनिधी) –** राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातून विद्यार्थ्यांना आयुष्यभर पुरेल, अशी संस्काराची शिदोरी मिळते. त्यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील शिबिरात अनुभव घेऊन सुसंस्कारीत राष्ट्र निर्माणासाठी पुढे यावे, असे प्रतिपादन पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांनी केले.

किनवटच्या सरस्वती विद्या मंदिर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर बोधडी बु.येथे संपन्न झाले. बुधवारी दि. २९ रोजी समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

'युथ फॉर माय भारत, युथ फॉर डिजिटल लिटरसी' या विषयाला घेऊन दि.२३ ते २९ जानेवारीपर्यंतच्या सात दिवसांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पोनि बिर्ला म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेपासूनच कायदा, सुव्यवस्था याचे भान ठेवावे. पोलिसांची प्रत्येक ठिकाणी गरज न पडू देता आपणच सक्षम पोलीस होऊन समाज उभारणीत योगदान द्यावे. कार्यक्रमाधिकारी डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी सात दिवसांमध्ये विद्यार्थ्यांनी बौद्धिक श्रमदान तसेच मनोरंजनाच्या विविध अशा कार्यक्रमांचा कसा आनंद घेतला, याचा उहापोह प्रास्ताविकातून केला. पत्रकार प्रदीप वाकोडीकर यांनीही मत मांडले. अशा शिबिरातून विद्यार्थी सक्षम नागरिक तयार होतो, असे मत पत्रकार आशिष देशपांडे यांनी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. आनंद भंडारे यांनी अशा शिबिरांची आवश्यकता व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपात कृष्णकुमार नेमानीवार यांनी मनोगत मांडले. सूत्रसंचालन डॉ. किरण आयनेनीवार यांनी केले. नेहा मडावी हिने स्वागत गीत गायिले. कार्यक्रमाधिकारी डॉ. मनोहर थोरात यांनी आभार मानले. यावेळी सात दिवशी शिबिरात भाग घेतलेल्या वैभव मेटकर, करण घोगेवार, दत्ता ढोले, कु. कोमल मेश्राम, कु. नेहा मडावी यांनी आपले अनुभव व्यक्त केले. शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

# वसंतराव नाईक यांचा आदर्श घेवून कार्य करणार –ना. इंद्रनील नाईक

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वर्गीय वंतराव नाईक यांनी वाडी तांड्यावर शिक्षणाची दालने खुली केली. बंजारा समाजाबरोबरच पददलीत समाजाच्या उन्नतीसाठी धोरणात्मक निर्णय घेतले. त्यांचा आदर्श घेवून आपणही सत्तेचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी करणार असल्याचे प्रतिपादन राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी येथे केले.

जिल्ह्यातील बंजारा समाज व कर्मचारी संघटनेच्यावतीने दि. १ फेब्रुवारी रोजी ना. इंद्रनील नाईक व आ. तुषार राठोड यांचा नियोजन भवनात नागरी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी आ.डॉ.तुषार राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

ना. नाईक पुढे म्हणाले, समाजाच्या विकासासाठी जे जे कांही करता येईल ते ते करण्याचा प्रयत्न करु असे



आश्वासन त्यांनी यावेळी समाजबांधवांना दिले. राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तब्बल एक दशकानंतर नाईक कुटूंबियांना सत्तेत सहभागी करुन घेण्याचा निर्णय घेतला. म्हणूनच आज मी राज्यमंत्री झालो आहे. आमच्या नाईक कुटूंबियात माझ्या रुपाने राज्याच्या सत्तेत सहभागी होण्याचा बहुमान अजित पवार यांनी मिळवून दिला असल्याचे ना. इंद्रनील नाईक यांनी सांगितले.

माझ्या मंत्रीपदाचा सदुपयोग बंजारा समाजाच्या उन्नतीबरोबरच पददलित, भटक्या विमुक्त समाजाच्या विकासासाठी करण्याचा माझा संकल्प आहे. आश्रमशाळेचे आधुनिकीकरण सुरु झाले आहे. प्रत्येक वाडी तांड्यावर डिजीटल आश्रम शाळा निर्माण करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

नांदेड–यवतमाळ या जिल्ह्याचे जुने राजकीय ऋणानुबंध आहेत. नांदेडकरांशी माझे कौटुंबिक ऋणानुबंध देखील आहेत. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील बंजारा समाजाशी माझे घरगुत्ती नातेसंबंध देखील असल्यामुळे तुमच्यात आणि माझ्यात नातेसंबंध आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आपण कटीबध्द असल्याचे आश्वासनही ना. इंद्रनील नाईक यांनी यावेळी दिले.

समाजाच्यावतीने करण्यात आलेल्या सत्कार सोहळ्यास उत्तर देताना, मुखेडचे लोकप्रिय आमदार डॉ. तुषार राठोड म्हणाले, मी मुखेड विधानसभा मतदारसंघाचा आमदार आहे. मला मतदारसंघाच्या बाहेर निधी देता येत नाही. बंजारा समाजाने माझाही सत्कार केल्याबद्दल मी ऋणी आहे. मतदारसंघाच्या बाहेरील समाज बांधवांना माझ्या परीने जेवढं शक्य होईल तेवढी मदत करण्याचे आश्वासन देतो असे ते म्हणाले.

यावेळी कल्याण राठोड सर, प्रा. सुरेश जाधव, कपिल राठोड, अमित राठोड. रोहन राठोड यांचेही भाषणे झाली. यावेळी समाजातील विविध क्षेत्रातील गुणवंताचा व सरपंचांचा गुणगौरव करण्यात आला. प्रारंभी प्रास्ताविक डॉ. विशाल पवार यांनी केले. कार्यक्रमाचे सुरेख सुत्रसंचालन गणपत चव्हाण व संग्राम पवार यांनी केले. बि.डी. जाधव यांनी आभार प्रदर्शन मानले.

या सत्कार सोहळ्याला इंजिनिअर शेषराव चव्हाण, देविदास राठोड, माजी जि. प. सभापती अॅड. रामराव नाईक, रोहिदास जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे, मेहरबान राठोड, प्रफुल राठोड, संजय पवार, गुलाब राठोड, डॉ श्रीराम राठोड, श्रीनिवास जाधव, संजय पवार आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# चंदेरी

## शाजान पदमसीने बॉयफ्रेंडसोबत उरकला साखरपुडा!





**अजय देवगणबरोबर 'दिल तो बच्चा है जी' आणि रणबीर कपूरबरोबर 'रॉकेट सिंग'मध्ये झळकलेली अभिनेत्री शाजान पदमसी तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. या अभिनेत्रीने तिच्या बॉयफ्रेंडबरोबर साखरपुडा केला आहे.**

साखरपुड्यातील काही फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करून ही आनंदाची बातमी दिली आहे. शाजान लग्न कधी करणार? याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. ३७ वर्षांची शाजान पदमसी व आशिष कनाकिया मागील काही वर्षांपासून डेट करत होते, आता त्यांनी साखरपुडा करून नात्यात पुढे जायचं ठरवलं आहे. शाजानचे होणारे पती आशिष हे कनाकिया ग्रुपचे डायरेक्टर आणि मूव्ही मॅक्स सिनेमाचे सीईओ आहेत. शाजानने या खास दिवसासाठी लेहेंगा निवडला, तर आशिष कनाकियाने शेरवानी घातली होती. शाजान पदमसी व आशिषची भेट एका कॉमन फ्रेंडद्वारे झाली होती. माझी आणि शाजानची ओळख माझ्या बालपणीच्या मित्राने करून दिली होती. मी पहिल्याच भेटीत आशिषकडे आकर्षित झाले होते. मात्र, मी घाई केली नाही. काही महिन्यांनंतर आम्ही दोघे डिनरवर भेटलो आणि नंतर आम्ही डेटिंग करू लागलो, असं शाजान म्हणाली होती. शाजानने तिच्यात व आशिषमध्ये काय साम्य आहे, ते सांगितलं होतं. आम्ही दोघे एकत्र खूप हसतो आणि मस्ती करतो. तो माझ्यावर खूप जोक्स करतो, आता मी हळूहळू ते जोक्स स्वीकारायला शिकले आहे. आशिष खूप काळजी घेणारा आहे. आम्ही दोघे पूर्णपणे वेगळ्या पार्श्वभूमीतून आलो आहोत, असं शाजान म्हणाली होती. शाजान पदमसीच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास, तिने 'हाउसफूल २', 'ऑरेंज', 'कनिमोळी', 'मसाला', 'पागलपन नेक्स्ट लेव्हल', 'डिस्को व्हॅली' यासह अनेक चित्रपटांमध्ये काम केलं आहे. शाजान व आशिषने साखरपुडा केला आहे, मात्र ते दोघेही लग्न कधी करणार याबाबत त्यांनी सांगितलेलं नाही. दोघेही यावर्षी लग्न करतील, अशा चर्चा होत आहेत.

## सुझान खान आजही आमच्या कुटुंबातील सदस्य : राकेश रोशन

बॉलीवूड अभिनेता हृतिक रोशनने २००० मध्ये 'कहो ना प्यार है' या चित्रटातून रुपेरी पडद्यावर पहिलं पाऊल ठेवलं. पहिल्याच चित्रपटाने त्याला मोठी प्रसिद्धी मिळवून दिली. या चित्रपटातील अभिनय आणि त्याच्या डान्स स्टेप्सने साऱ्यांनाच भुरळ घातली. यशानंतर त्याने लगेचच सुझान खानबरोबर लग्न केलं. त्यानंतर २०१४ मध्ये त्यांचा घटस्फोटही झाला. आता ऋतिक रोशनच्या घटस्फोटावर वडील राकेश रोशन यांनी मोकळेपणाने त्यांचं मत व्यक्त केलं आहे.

राकेश रोशन यांनी नुकतेच एका मुलाखतीत यावर उघडपणे भाष्य केलं. हृतिक रोशनबरोबर घटस्फोट झालेला असूनही सुझान खानचे रोशन कुटुंबाशी काय नातं आहे? या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी सांगितलं, त्या दोघांचं नातं तुटलेलं असलं तरी सुझान खान आजही आमच्या कुटुंबातील एक सदस्य आहे, असे ते म्हणाले. जे काही झालं ते एका जोडप्यामध्ये झालं. ते दोघेच एकमेकांच्या प्रेमात पडले, त्या दोघांनीच एकमेकांबद्दल मनात गैरसमज केले आणि वेगळे झाले. आमच्यासाठी सुझान या घरात आली तेव्हापासून आतापर्यंत ती या घरातील एक सदस्य आहे. मी अतिशय शिस्तबद्ध व्यक्ती आहे. त्यामुळे लहान असताना हृतिक आणि माझी मुलगी मला घाबरायचे. असं नाही की मी पटकन कुणाला ओरडतो. मात्र, मला शिस्तबद्ध राहणं आवडतं. माझं लग्न फार कमी वयात झालं होतं. अगदी वयाच्या २० ते २३ वर्षांत मला मुलं झाली होती. त्यामुळे आता आम्ही सगळे मित्रांसारखे राहतो. आम्ही मित्रांप्रमाणे एकमेकांशी वागतो, असं राकेश रोशन यांनी सांगितलं. हृतिक रोशन आणि सुझान खान या दोघांनी २०१४ मध्ये घटस्फोट घेतला आहे. मात्र, त्यांनी हा निर्णय का घेतला यावर दोघांनी अद्यापही भाष्य केलेलं नाही. इतकेच नाही तर हे दोघे आजही एकमेकांशी चांगल्या पद्धतीने संवाद साधतात. हृतिक सध्या सबा आझादला डेट करत आहे, तर सुझान खान अर्सलान गोनीला डेट करत आहे.



## 'डॉन ३'मध्ये रणवीर सिंहला देणार टक्कर विक्रांत मॅसी!

बॉलीवूडमधील 'डॉन' सिनेमा आणि त्याचा रिमेक आणि पुढे याच सिनेमाचे आलेले भाग लोकप्रिय आहेत. १९७८ साली अमिताभ बच्चन यांचा आलेल्या डॉनचा फरहान अख्तरने २००७ मध्ये रिमेक केला. यात शाहरुख खानने मुख्य भूमिका केली होती. याच सिनेमाचा 'डॉन २' हा दुसरा भाग आला. यात शाहरुख खानची एन्ट्री, डायलॉग्स यामुळे प्रेक्षकांनी या सिनेमाला डोक्यावर घेतले होते. या सिनेमाच्या तिसऱ्या पार्टची घोषणा झाल्यावर मात्र यात शाहरुख दिसणार नसल्याने कोणता अभिनेता ही भूमिका करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. रणवीर सिंह या सिनेमात डॉनची भूमिका साकारणार अशी घोषणा चित्रपटांच्या निर्मात्यांनी केली. आता या सिनेमात खलनायकाची भूमिका कोण साकारणार या चर्चा सुरू आहे.

छोट्या पडद्यावरून करिअरची सुरुवात करणारा प्रसिद्ध अभिनेता 'डॉन ३' मध्ये खलनायकाची भूमिका साकारणार आहे. बॉलीवूडमध्ये सर्वोत्तम अभिनेत्यांच्या यादीत आता नाव सामील झाले आहे. या अभिनेत्याने 12th फेल आणि डेथ ऑफ द गंज यांसारख्या चित्रपटांमध्ये आपल्या अभिनय कौशल्याची चुणूक दाखवली आहे. या अभिनेत्याचे नाव आहे विक्रांत मॅसी. ओटीटीवर प्रदर्शित झालेल्या 'सेक्टर ३६' या चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारल्यानंतर विक्रांत मॅसी आता मोठ्या पडद्यावरही खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. रिपोर्टनुसार, विक्रांत फरहान अख्तरच्या बहुचर्चित चित्रपट 'डॉन ३' मध्ये खलनायकाची भूमिका साकारणार आहे.

आतापर्यंत या चित्रपटाच्या निर्मात्यांनी रणवीर सिंग आणि कियारा अडवाणी यांच्या नावांचीच अधिकृत घोषणा केली आहे. याआधी रणवीर आणि विक्रांतने 'लूटेरा' आणि 'दिल धडकने दो' या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. मात्र, या दोन्ही चित्रपटांमध्ये विक्रांतने सहाय्यक अभिनेत्याच्या भूमिका साकारल्या होत्या. मात्र आता तो रणवीरसमोर मुख्य भूमिकेत झळकणार आहे. विक्रांत मॅसी शेवटचा 'द साबरमती रिपोर्ट' या चित्रपटात दिसला होता.



## १८० फ्लॉप सिनेमे देणारा बॉलीवूड अभिनेता मिथून ४०० कोटींचा मालक

**चित्रपट फ्लॉप होईल की हिट हे प्रेक्षक ठरवतात. दरवर्षी अनेक चित्रपट रिलीज होतात, त्यातले काही गाजतात; तर काही चित्रपट केव्हा रिलीज होतात आणि गाशा गुंडाळतात हे कळतही नाही. एका बॉलीवूड स्टारने त्याच्या करिअरमध्ये तब्बल १८० फ्लॉप चित्रपट दिले होते. करिअरमध्ये इतके फ्लॉप चित्रपट देणारा हा सुपरस्टार आजही सिनेसृष्टीत सक्रिय आहे.**

या स्टारची गणना ८० च्या दशकात अमिताभ बच्चन, धर्मेंद्र, जितेंद्र, विनोद खन्ना आणि राजेश खन्ना यांसारख्या सुपरस्टार्समध्ये व्हायची. प्रचंड संघर्ष केल्यानंतर सिनेसृष्टीत या अभिनेत्याला यश मिळालं, चित्रपटाच्या खूप ऑफर आल्या. अभिनेत्याने चित्रपटही केले, पण त्यातले अनेक फ्लॉप ठरले होते. करिअरमध्ये इतके फ्लॉप चित्रपट देणाऱ्या अभिनेत्याचे नाव मिथुन चक्रवर्ती होय. मिथुन यांनी त्यांच्या ४७ वर्षांच्या करिअरमध्ये १८० फ्लॉप चित्रपट दिले. त्यांनी स्वतःचे २०० चित्रपट पाहिलेच नसल्याचं म्हटलं जातं. मिथून चक्रवर्ती यांनी इतके फ्लॉप चित्रपट दिले असले तरी त्यांच्या हिट चित्रपटांची संख्याही मोठी आहे. मिथुनदा दरवर्षी एक डझनपेक्षा जास्त चित्रपटांमध्ये काम करायचे. एक वेळ अशी आली होती की मिथुन यांनी सलग ३३ फ्लॉप चित्रपटांमध्ये काम केले होते. १९८९ साली तर वर्षभरात त्यांनी तब्बल १९ चित्रपट केले होते. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत २७० हून अधिक चित्रपटांमध्ये अभिनय केला, त्यापैकी १८० चित्रपट फ्लॉप आहेत. या यादीत त्यांच्यानंतर जितेंद्र यांचा नंबर लागतो. जितेंद्र यांच्या नावावर १०१ फ्लॉप चित्रपट आहेत. मी ३७० हून अधिक चित्रपट केले आहेत, त्यापैकी जवळपास २०० चित्रपट मी आजपर्यंत पाहिलेले नाहीत. मी सर्व चित्रपटांमध्ये पूर्ण प्रामाणिकपणे आणि मेहनतीने काम केले, असं एका मुलाखतीत मिथुन चक्रवर्ती म्हणाले होते. मिथुन यांचा खूप मोठा चाहता वर्ग आहे आणि खूप लोक त्यांना सुपरस्टार मानतात. ते जवळपास ४०० कोटींच्या संपत्तीचे मालक आहेत. मिथुन चक्रवर्ती यांच्याकडे अनेक महागड्या कार आहेत ज्यात मर्सिडीज बेंझ १९७५, टोयोटा फॉर्च्युनर आणि फोर्ड एंडेव्हरसह अनेक आलिशान कारचा समावेश आहे.



## प्रियांका चोप्रा महेश बाबूच्या सिनेमातून करणार कमबॅक

**प्रियांका चोप्रा एस. एस. राजामौली यांच्या 'SSMB29' या बहुप्रतिक्षित चित्रपटात झळकणार आहे. या चित्रपटात महेश बाबू मुख्य भूमिकेत आहे. प्रियांका चोप्रा, एस. एस. एस राजामौली आणि महेश बाबू हे दिग्गज एकत्र काम करणार असल्याने या चित्रपटाची सोशल मीडियावर चर्चा सुरू आहे. बॉलीवूडची देसी गर्ल 'स्काय इज पिंक' या २०१९ साली आलेल्या हिंदी चित्रपटात शेवटची दिसली होती. गेली ५ वर्षे ती कुठल्याही हिंदी किंवा भारतीय सिनेमात दिसली नव्हती.**

प्रियांका चोप्रा 'SSMB29' या साउथच्या चित्रपटातून भारतीय सिनेमात पुनरागमन करत आहे. मधल्या काळात ती केवळ हॉलीवूड चित्रपटात दिसली. प्रियांकाने या सिनेमासाठी घेतलेल्या मानधनाची चर्चा रंगत आहे. तिने तब्बल ३० कोटी रुपयांची मागणी केली आहे. या मानधनामुळे ती एस.एस. राजामौली यांच्यासोबत आतापर्यंत काम केलेल्या सर्वात महागड्या अभिनेत्रींपैकी एक ठरली आहे. RRR साठी आलिया भट्टने घेतलेले ९ कोटी रुपये आणि 'बाहुबली'साठी अनुष्का शेट्टीने घेतलेले ५ कोटी रुपये यांना मोठ्या फरकाने मागे टाकले आहे. असे असले तरी अद्याप चित्रपटाशी संबंधित कोणत्याही अधिकृत स्रोतांकडून या वृत्ताला दुजोरा देण्यात आलेला नाही. दरम्यान, 'SSMB29' च्या शूटिंगला हैदराबादच्या अल्युमिनियम फॅक्टरी येथे सुरुवात झाली असून, महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा दोघेही चित्रीकरणासाठी हजर आहेत. चित्रीकरणादरम्यान कोणतीही माहिती बाहेर जाऊ नये यासाठी एस.एस. राजामौली यांनी संपूर्ण टीमला एक गोपनीयता करार (NDA) साइन करण्यास सांगितले आहे, ज्यामुळे शूटिंग दरम्यान कलाकारांसह सेटवरील कुठल्याही व्यक्तीला मोबाईल फोन वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही. SSMB29 च्या टीमचे पुढील शूटिंग केनियाच्या जंगलांमध्ये होणार आहे, जिथे काही महत्त्वाची दृश्ये चित्रित केली जाणार आहेत. Pinkvilla च्या रिपोर्टनुसार, हा चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित होईल, पहिला भाग २०२७ मध्ये आणि दुसरा भाग २०२९ मध्ये रिलीज केला जाणार आहे.



## प्रसिद्ध रॅपर रफ्तार दुसऱ्यांदा लग्नबंधनात

रॅप इंडस्ट्रीमधील प्रसिद्ध रॅपर रफ्तार दुसऱ्यांदा लग्नबंधनात अडकला आहे. अलीकडेच त्याच्या लग्नाची पत्रिका, हळदीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. पण रफ्तारने स्वतः दुसऱ्या लग्नाबाबत अधिकृतरित्या घोषणा केली नव्हती. पण आता रफ्तारच्या दुसऱ्या लग्नाचे फोटो, व्हिडीओ समोर आले आहेत.



३१ जानेवारीला रफ्तार फॅशन स्टायलिस्ट, अभिनेत्री मनराज जवंदाशी लग्नाच्या बेडीत अडकला आहे. जवळच्या मित्रांच्या आणि कुटुंबाच्या उपस्थितीत रफ्तार आणि मनराजचं मोठ्या थाटामाटात लग्न झालं आहे. दाक्षिणात्य रिती-रिवाजानुसार रफ्तार आणि मनराजने लग्न केलं आहे. रफ्तारचं हे दुसरं लग्न आहे. याआधी डिसेंबर २०१६मध्ये रफ्तारने कोमल वोहराशी पहिलं लग्न केलं होतं. या लग्नाच्या आधी दोघं पाच वर्षे एकमेकांना डेट करत होते. पण लग्नाच्या काही वर्षांनी २०२० मध्ये रफ्तारने कोमलबरोबर घटस्फोट घेण्याचे निश्चित केले. परंतु, कोरोनामुळे घटस्फोटाच्या प्रक्रियेत विलंब झाला. त्यामुळे रफ्तार आणि कोमलने २०२२ मध्ये घटस्फोट घेतला. रफ्तारची दुसरी पत्नी मनराज जवंदाचा जन्म कोलकातामध्ये झाला होता. ती फॅशन स्टायलिस्ट, फिटनेस फ्रीक आणि अभिनेत्री आहे. पदवीचं शिक्षण घेतल्यानंतर मनराजने मुंबईच्या FAD इंटरनॅशनमध्ये स्टायलिंगचा कोर्स केला होता. रफ्तारबरोबर तिने बऱ्याच म्युझिक व्हिडीओमध्ये काम केलं आहे. ती काही रिॲलिटी शोमध्येदेखील झळकली होती. याशिवाय तिने बऱ्याच जाहिरातीमध्ये काम केलं आहे.

## राखी सावंतशी तिसरं लग्न करण्यास 'त्याचा' नकार

### डोडी खान आहे कोण?

डोडी खान पाकिस्तानचा एक लोकप्रिय अभिनेता आणि मॉडेल आहे. त्यानं 'दुर्ज', 'घबराना नहीं है', 'अखाडा', 'चौधरी' यांसारख्या बऱ्याच लोकप्रिय चित्रपटांमध्ये काम केलं आहे. तो संजय दत्तला आदर्श मानतो. त्याला बॉडी बिल्डिंगमध्ये खूप रस आहे आणि त्यामुळे तो बराच वेळ जिममध्ये घालवतो. डोडीने सोशल मीडियावर अनेक जिम ट्रेनिंगचे व्हिडीओ पोस्ट केले आहेत. राखी सावंतने लग्नाबद्दल म्हटले होते, की लग्न पाकिस्तानमध्ये इस्लामी रिती-रिवाजानुसार होणार आहे. भारतात रिसेप्शन करणार असून हनीमूनसाठी स्वित्झर्लंड किंवा नेदरलँडला जाणार आहे, तर दुबईत स्थायिक होणार आहेत. याआधी राखी सावंतने दोनदा लग्न केलं होतं. आता हे राखीचं तिसरं लग्न होतं. मात्र ते होण्याआधीच मोडलं.



**कॉन्ट्रोव्हर्सी व ड्रामा क्वीन राखी सावंत पुन्हा एकदा चर्चेत आहे. यावेळीही चर्चेचं कारण तिचं लग्न आहे. राखी सध्या तिच्या तिसऱ्या लग्नाच्या बातम्यांमुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी राखीने दावा केला होता की ती पाकिस्तानची सून होणार आहे. ती पाकिस्तानी अभिनेता डोडी खानशी लग्न करत आहे, मात्र आता डोडीने नकार दिला आहे. त्याने राखी सावंतची माफीही मागितली आहे.**

राखी सावंतने म्हटलं होतं की ती पाकिस्तानी अभिनेता आणि पोलीस अधिकारी डोडी खानच्या प्रेमात आहे आणि दोघेही लवकरच लग्न करणार आहेत. आम्ही दोघे एकमेकांवर प्रेम करतो. तो पाकिस्तानचा आहे आणि मी भारताची आहे, त्यामुळे आम्ही प्रेमविवाह करणार आहोत, असं राखी म्हणाली होती. पाकिस्तानची सून झाल्यावरही नेहमीच भारताची मुलगी राहीन, असं राखीने म्हटलं होतं. राखीच्या लग्नाची बातमी दिल्यानंतर आता डोडी खान म्हणाला की, त्याने राखीला प्रपोज केलं होतं, पण आता तो लग्न करणार नाही. राखीने तिच्या आयुष्यात खूप दुःख पाहिलंय, तिच्या धाडसीपणामुळेच ती आवडते, असं डोडीने म्हटलं. डोडी म्हणाला, की नमस्कार भारत आणि पाकिस्तान, मी डोडी खान आहे. काही दिवसांपूर्वी तुम्ही सोशल मीडियावर माझा एक व्हिडीओ पाहिला असेल, ज्यात मी राखी सावंतला प्रपोज केले होते. मी तिला चांगलं ओळखतो. त्यामुळे मी तिला प्रपोज केलं होतं. मला समजलं की तिचा देवावर खूप विश्वास आहे. तिने तिच्या आयुष्यात खूप चढ-उतार पाहिले आहेत, तिने तिचे आई-वडील गमावले आहेत, ते आजारी असताना ती त्यांच्याबरोबर होती. तिच्या आयुष्यात एक मुलगा आला, त्याने तिच्याबरोबर काय केलं, ते तुम्हा सर्वांना माहीत आहे. ती त्या धक्क्यातून बाहेर आली आहे. तिने इस्लाम धर्म स्वीकारला, उमराहसाठी गेली आणि तिचे नाव बदलून फातिमा ठेवले. मला ते खूप आवडलं म्हणून मी तिला प्रपोज केलं. लग्नाला नकार देण्याचं कारण सांगत डोडी म्हणाला, पण, मला वाटतं की लोकांना हे नातं मान्य नाही. कारण मला खूप मेसेज आणि व्हिडीओ आले आहेत आणि मी ते सहन करू शकत नाही. राखी तू माझी खूप चांगली मैत्रीण आहेस आणि कायम राहशील. पण मी तुझ्याशी लग्न करू शकत नाही. मी तुला वचन देतो की तू पाकिस्तानची सून होशील. मी तुझे लग्न माझ्या एका भावाशी लावेन.



# मराठीतील अभिजात साहित्य पुढच्या पिढीकडे नेण्याकरिता कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे :** तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत आणि देशातून, राज्यातून, परदेशातून आलेल्या साहित्यिक, मराठीप्रेमींच्या प्रचंड उत्साहात उद्घाटन झाले.

आजच्या कृत्रिम बुद्धीमत्तेच्या युगात मराठीतील आपले अभिजात साहित्य पुढच्या पिढीकरिता कसे नेता येईल यादृष्टीने चॅट-जीपीटी सारखे एखादे 'स्मॉल लँग्वेज मॉडेल' तयार करण्यासाठी मराठी भाषा विभागाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.

फर्ग्यूसन महाविद्यालय येथे संमेलनाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुख्यमंचात झालेल्या या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर- म्हैसकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला त्यांचे मनापासून आभार मानतो, असे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, हा दर्जा देण्याचे भाग्य लाभले असा उल्लेख श्री. मोदी यांनी केला आहे. प्रमाण मराठीच्या माहेरघरी आणि मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले संमेलन होत आहे ही खरोखर आपल्या सगळ्यांकरता अतिशय आनंदाची गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर पुढील महिन्यात पहिल्यांदा दिल्लीला अखिल भारतीय साहित्य संमेलन होत आहे, ही देखील आपल्या सर्वांसाठी आनंदाची गोष्ट आहे, असेही ते म्हणाले.

वयाच्या चौथ्या वर्षी साहित्याच्या निर्मितीला सुरूवात करुन अजूनही वयाच्या ९३ व्या वर्षी सर्व प्रकारचे साहित्य निर्माण केलेल्या सृजनशील साहित्यिक पद्मश्री मंगेश कर्णिक यांना या संमेलनाचा पहिला साहित्यभूषण पुरस्कार देताना आनंद होत आहे, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली.

या संमेलनाला महाराष्ट्रातून, इतर राज्यातून, परदेशातून मराठीप्रेमी, साहित्यिक आले असून मराठी भाषा विभागाने खऱ्या अर्थाने हे संमेलन वैश्विक अशा दर्जाचे केले आहे. जगाच्या पाठीवर एकही देश असा नाही जिथे मराठी माणूस पोचलेला नाही. दाओस वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम येथे गेलो असता तेथील एका चिमुरड्याने 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे सुंदर म्हणून दाखवले हे पाहून अभिमान वाटला की मराठी माणूस इतक्या वर्षापासून परदेशात गेला तरी माय मराठी त्याच्यापासून दुरावली नाही, आणि ती पुढच्या पिढीकडे पोहोचविण्यासाठी प्रयत्न करतो आहे.

भाषा ही भावना व्यक्त करण्याचे साधन, संपर्काचे साधन असते आणि केवळ अभिव्यक्ती नाही तर अभिव्यक्तीतून सृजन करण्याचे देखील साधन असते. म्हणूनच आज मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणजे राज मान्यता मिळाली आहे. मराठी भाषा ही अभिजात होतीच, प्राचीन भाषा होतीच परंतु कुठल्याही भाषेला राज मान्यता मिळणे देखील महत्त्वाचे असते. मोगलांनी या देशाची राजभाषा फारसी केली होती; त्या काळामध्ये छत्रपती शिवरायांनी आज्ञापत्र काढून स्वराज्याची भाषा मराठी भाषा करुन मराठीला राजमान्यता देण्याची खऱ्या अर्थाने सुरूवात केली.

मराठीची मुळे खोलवर गेलेली आहे. आपली मराठी भाषा काही किलोमीटरवर बदलते पण प्रत्येक ठिकाणी तिची गोडी वाढतच जाते. किंबहुना मराठीच्या बोलीभाषांत निर्माण झालेले साहित्य, त्याचे प्रकार व बोलीभाषातील काव्य आदींची गोडी वेगळीच असून मनाला अतिशय मनाला भावनारे असल्याचे पहायला मिळते.

# कलशारोहणानिमित मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज हदगावात



**हदगाव**-येथील श्रीकृष्ण मंदिराच्या कलशा-रोहणाचा कार्यक्रम रविवार, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येणार आहेत, अशी माहिती ओबीसी महामंडळाचे अध्यक्ष तथा नागपूर मनपातील सत्ताधारी पक्षाचे गटनेते अविनाश ठाकरे यांनी दिली.

हदगाव येथील महानुभाव पंथीयांचे जाज्वल्य देवस्थान असलेल्या श्रीकृष्ण मंदिराचे महंत महान तपस्वी श्री संत दत्ता बापू यांच्या संकल्पनेतील मंदिराचे काम त्यांचे उत्तराधिकारी मठाधिपती योगीराज बापू यांनी पूर्णत्वास नेले. त्यानिमित्त श्रीमद् भागवत सप्ताह धर्म परिषद होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकाळी अकरा वाजून पन्नास मिनिटांनी हेलिकॉप्टरने हडसणी शिवारातील श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड या साखर कारखान्याच्या परिसरातील हेलिपॅडवर उतरतील. तेथून मोटारीने हदगांव शहरातील श्रीकृष्ण मंदिरात येऊन पूजा करुन दर्शन घेतील. त्यानंतर पायी चालत बाजूलाच असलेल्या मंडपामध्ये संतमहंतांचे दर्शन व सत्कार करतील. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत. तसेच वेळ मिळाल्यास विश्रामगृहावर पंधरा-वीस मिनिटात कार्यकर्त्यांशी हितगुज करुन नंतर ते हेलीपॅडवर जाऊन थेट नागपूरकडे प्रयाण करतील, असे अविनाश ठाकरे यांनी सांगितले.

रविवार, दि. २६ जानेवारी पासून कलशारोहणाच्या कार्यक्रमानिमित्त श्रीमद् भागवत सप्ताहाला हदगांव येथे सुरुवात झाली आहे. या सप्ताहाचा शुभारंभ हदगांव येथील महादेव मठाचे मठाधिपती शिवचैतन्य शिवाचार्य महाराज, महंत गोपाळ गिरी महाराज व श्रीकृष्ण मंदिर उखळाई आश्रमाचे मठाधिपती महंत योगीराज बापू यांच्या उपस्थितीमध्ये आमदार बाबुराव कदम, माजी खासदार सुभाषराव वानखेडे व अनिल पाटील बाभळीकर यांच्या हस्ते फित कापून शुभारंभ करण्यात आला. सुरू झालेला श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ श्रीकृष्णमूर्ती पंचकृष्ण महापूजा करण्यात आली. या भागवत कथेचे प्रवचनकार परमपूज्य महंत चिरडे बाबा हे आहेत. शनिवार, दि. १ फेब्रुवारी रोजी शोभायात्रा काढण्यात आली.

शनिवारी झालेल्या पत्रकार परिषदेला अविनाश ठाकरे यांच्यासोबतच हदगावचे आमदार बाबुराव कदम, भाजपचे तालुकाध्यक्ष तातेराव वाकोडे, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य तथा हिमायतनगर भाजपचे प्रभारी भागवत देवसरकर, चंद्रशेखर कदम, व्यंकटेश लोणे, बाळासाहेब देशमुख, निळू पाटील, आनंदराव भंडारे, बालासाहेब कदम, सचिन पाटील शिरफुले, बबन कदम, उमाकांत भोरे, बाला पाटील कदम, सुशील नावडे, सुरेश सारडा, तुकाराम चव्हाण, राजू तावडे आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# सोयाबीन खरेदीला सहा दिवसाची मुदतवाढ; ६ फेब्रुवारीपर्यंत खरेदी होणार

## सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा



**मुंबई-** राज्यात सोयाबीनची खरेदी वेगाने चालू असून ३१ जानेवारी नंतर सोयाबीनची खरेदी पुढे काही दिवस चालू रहावी, अशी राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात मागणी होती. त्या अनुषंगाने सोयाबीन खरेदीसाठी आणखी काही दिवस मुदतवाढ मिळावी यासाठी केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाला आम्ही प्रस्ताव पाठवला होता. तो प्रस्ताव केंद्रीय कृषिमंत्र्यांनी मान्य केला असून सोयाबीन खरेदीला ६ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढ दिली आहे, अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

मंत्री श्री.रावल म्हणाले की, राज्यात ३१ जानेवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत देण्यात आली असल्याने आज ती मुदत संपली होती. सोयाबीन खरेदीची मुदत वाढावी अशी राज्यातील लोक प्रतिनिधी व शेतकऱ्यांची मागणी होती, ही मागणी लक्षात घेता यासाठी आमचा प्रत्यक्ष पाठपुरावा सुरू होता. आज ती मुदतवाढ मिळाली. या मुदतवाढीमुळे राज्याला दिलेल्या १४ लाख १३ हजार २६९ मेट्रिक टन पी पी एस खरेदी उद्दिष्ट पूर्ण करता येणार असून सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यात नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून ५६२ खरेदी केंद्रावर ३० जानेवारीपर्यंत ४ लाख ३७ हजार ४९५ शेतकऱ्यांकडून ९ लाख ४२ हजार ३९७ मेट्रिक टनापेक्षा अधिक सोयाबीनची खरेदी झाली आहे. दि.६ फेब्रुवारीपर्यंत या आकड्यात मोठी वाढ होऊन समाधानकारक खरेदी होणार आहे. अनेक जिल्ह्यांनी आपले उद्दिष्टे पूर्ण केले आहे. काही जिल्ह्यांना उद्दिष्टे वाढवून दिली आहेत. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य सरकारच्या मागणीनुसार केंद्र सरकारने ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे मंत्री श्री.रावल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान आणि केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

# फॉरेन्सीक प्रकरणांच्या विश्लेषणामध्ये ४० टक्क्यांची वाढ

**मुंबई :** न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयात २०२४ मध्ये फॉरेन्सिक प्रकरणांच्या प्राप्तीमध्ये २२ टक्के वाढ झाली आहे. प्राप्त झालेल्या प्रकरणांची संख्या जानेवारी २०२४ मध्ये २० हजार ६५८ वरून डिसेंबर २०२४ मध्ये २५ हजार २५८ पर्यंत वाढली आहे. त्याचवेळी, प्रकरणांच्या विश्लेषण क्षमतेत महत्त्वपूर्ण सुधारणा झाली आहे. जानेवारी २०२४ मध्ये १६ हजार १० वरून डिसेंबर २०२४ मध्ये २२ हजार ७७० प्रकरणांचे विश्लेषण करण्यात आले आहे. विश्लेषण करण्यात आलेल्या अहवालांमध्ये ४० टक्क्यांनी वाढ नोंदविण्यात आली आहे.

या वाढीला हाताळण्यासाठी आणि प्रकरणांचे निराकरण वेगाने करण्यासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळा संचालनालयाने भरती आणि आधुनिक तंत्रज्ञानावर भर दिला आहे. २०२४ मध्ये संचालनालयाने ५३ पदांची भरती केली आहे. ज्यामध्ये दोन उप संचालक, तीन सहाय्यक संचालक, ३३ पदे सहाय्यक रासायनिक विश्लेषक, १५ पदे वैज्ञानिक अधिकारी (सायबर) यांची आहेत. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोग १७ सहाय्यक संचालकांची भरती प्रक्रिया पार पडत आहे. यासोबतच वर्ग तीन कर्मचाऱ्यांची पदभरतीदेखील करण्यात येत आहे.

संचालनालय प्रलंबित प्रकरणांच्या निवारणासाठी विशेष उपाययोजना करीत आहे. आवश्यकतेनुसार कंत्राटी कर्मचारी घेण्यात येत आहे. यामध्ये १७० फॉरेन्सिक पदे, वर्ग चार ची १६६ पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यात आली आहे. उर्वरित पदे राष्ट्रीय फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटी (छत्रऊण) द्वारा भरली जाणार आहेत. तसेच फॉरेन्सिक क्षमतांचा विस्तार आणि सायबर फॉरेन्सिक विश्लेषणाची गती वाढवून प्रलंबित प्रकरणांच्या निवारणासाठी सेमी-ऑटोमॅटिक प्रोसेसिंग सोल्युशन व डिजिटल फॉरेन्सिक्समधील उत्कृष्टता केंद्र यावर काम करण्यात येत आहे. हे प्रकल्प अत्याधुनिक फॉरेन्सिक वर्क स्टेशन्स, डेटा मिळविण्याची उपकरणे, प्रगत डेटा प्रक्रिया आणि विश्लेषणाचे उपाय एकत्र करतात. ज्यामुळे सायबर प्रकरणांच्या तपासण्याची गती आणि अचूकता मोठ्या प्रमाणात सुधारली आहे.

उच्च संवेदनशील प्रकरणांना संचालनालय प्राधान्य देत आहे. यामध्ये पॉस्को प्रकरणे (बालकांचे लैंगिक शोषण प्रतिबंधक कायदा), अंडर ट्रायल प्रीझनर प्रकरणे, न्यायालयांकडून आदेश दिलेली प्रकरणे यांचा समावेश आहे. या ठोस उपक्रमांसह संचालनालय महाराष्ट्र न्यायवैद्यक विज्ञान सेवा मजबूत करण्यासाठी, प्रकरणांचे निराकरण वेगाने करण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली आहे.

## Change In Name

MY Old Name IS : KALASKAR ROOPALI DONDIBARAO Which Now I Am Changing As New Name: RUPALI DHONDIBARAO KALASKAR henceforth his all correspondence will be done as per his new name. Please consider the same. Address- C/o H.No. 1-1-280, PARAS NAGAR, Near Narsingh VidhyaMandirPost-Shivaji Nagar, Nanded, Dist. Nanded Maharastra-431602 Mo, No. 9765299978

# प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती बंधनकारक; समिती गठीत न केल्यास ५० हजार दंड

**मुंबई :** कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध कायद्यानुसार सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालय, आस्थापनेमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे आवश्यक आहे. समिती गठीत न केल्यास ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल, अशी माहिती मुंबई शहराचे जिल्हाधिकारी संजय यादव यांनी दिली आहे.

दहा व त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या प्रत्येक कार्यालयात समिती गठित करणे आवश्यक आहे. या समितीमध्ये कार्यालयातील वरिष्ठ महिलेची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करावी, तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यांमधून सामाजिक कार्याचा अनुभव किंवा कायद्याचे ज्ञान असलेले दोन कर्मचारी सदस्य म्हणून नियुक्त करावेत व महिलांच्या प्रश्नांशी बांधिल असलेल्या अशासकीय संघटनेचा एक सदस्य असावा. त्याचप्रमाणे प्रत्येक कार्यालयाने अंतर्गत तक्रार समिती गठीत केल्याचा फलक दर्शनी भगात लावणे बंधनकारक आहेत. तसेच या अधिनियमानुसार दर तीन वर्षांनी या समितीची स्थापना किंवा पुनर्रचना करणे आवश्यक आहे. असे या कायद्याच्या अमलबजावणी करून घेणारे जिल्ह्याचे प्रमुख उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) तथा जिल्हा अधिकारी गणेश सांगळे यांनी सांगितले आहे.

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संदर्भातील अधिनियमानुसार प्रत्येक शासकीय/निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था शाखा ज्यांची शासनाने स्थापना केली असेल किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असेल किंवा पूर्ण किंवा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निधी, शासनामार्फत किंवा स्थानिक किंवा शासकिय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सरकारी संस्था यांना दिला जातो.

## साहित्य अकादमी पुरस्कार प्रक्रियेत बदल

**नवी दिल्ली :** साहित्य अकादमीने मान्यता दिलेल्या २४ भारतीय भाषांमधील दरवर्षी दिल्या जाणाऱ्या देशातील सर्वात प्रतिष्ठित साहित्यिक पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे.

साहित्य अकादमीने पहिल्यांदाच लेखक, प्रकाशक आणि त्यांच्या हितचिंतकांकडून वर्ष २०२५ च्या मुख्य पुरस्कारासाठी २४ भाषांमधील पुस्तके निवडण्यासाठी आमंत्रित केले आहे. पुस्तके सादर करण्याची शेवटची तारीख २८ फेब्रुवारी २०२५ आहे.

२०२५ च्या पुरस्कारांसाठी १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत प्रकाशित झालेल्या पुस्तकांची एक प्रत अर्ज भरून विचारार्थ पाठवता येईल.


CONSULTING PHYSIOTHERAPIST
कन्सल्टिंग फिजिओथेरपीस्ट
डॉ.ईश्वर जी. हिंगोलीकर (PT) (B.P. Th)
उपलब्ध सुविधा
• कपिंग थेरपी (गोल्ड मेडलिस्ट) • ड्राय नीडलींग थेरपीस्ट
• ऑर्थोपेडिक रिहॅबिलिटेशन • टेपींग थेरपीस्ट
• न्यूरो रिहॅबिलिटेशन
नांदेड
होम व्हिजीट उपलब्ध 9657631231


## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६/२०२५
सुनिलकुमार विरुध्द शाखाधिकारी

अर्जदार :- १. सुनिलकुमार पुंडलिकराव आरबड, वय - ४५ वर्षे, रा. बेळकोणी (खु.) ता. बिलोली जि. नांदेड.

विरुध्द

शाखाधिकारी,
दि. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड, शाखा - कासराळी ता. बिलोली जि. नांदेड.

विषय :- उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळणे बाबत.....

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, पुंडलिकराव संभाजी आरबड यांचे अर्जदार हा मुलगा आहे. मयत पुंडलिकराव संभाजी आरबड यांचा मृत्यु दिनांक ३०/०४/२०२२ रोजी वृध्दापकाळाने त्यांच्या राहत्या घरी मौ. बेळकोणी (खु.) येथे झाला आहे . तसेच अर्जदाराची आई दि. २०/१०/२०२१ रोजी वारली आहे. अर्जदार हे मौ. बेळकोणी (खु.) ता. बिलोली जि. नांदेड येथील रहीवासी आहेत. मयत पुंडलिकराव संभाजी आरबड यांच्या नावे गैरअर्जदार यांच्या बँकेत बचत खाते क्र. ११५२११००२००१२१९ असून त्यामध्ये रक्कम रु. ३४,८९०.६० पैसे जमा आहेत. सदर रक्कम उचलण्यासाठी अर्जदार बँकेत गेले असता त्यांनी अर्जदारास वारसा प्रमाणपत्राची मागणी केली त्यामुळे अर्जदारास सदर वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयताच्या पश्चात मयताचे अर्जदार हाच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

हे की, मयत पुंडलिकराव संभाजी आरबड यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारानी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०७/०३/२०२५ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि. २७ जानेवारी, २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

## जाहीर प्रगटन

विलोली येथील दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
ता. विलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.३१/२०२५ पुढील तारीख -०७.०३.२०२५

अर्जदारः०१. सागर भ्र. दिलीप शिंदे, वय - ५२ वर्षे, व्यवसाय - घरकाम, ०२. माधव पि. दिलीप शिंदे, वय - ३० वर्षे, व्यवसाय शेती, ०३. योगेश पि. दिलीप शिंदे, वय-२९ वर्षे, व्यवसाय - शेती, सर्व रा. मराठागल्ली, कुंडलवाडी, ता. बिलोली, जि. नांदेड .

विरुध्द

अर्जदार : निरंक

विषय - वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हयांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ हे मयत दिलीप पि. मारोती शिंदे यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार क्रमांक ०१ हि मयत दिलीप पि. मारोती शिंदे यांची पत्नी आहे व अर्जदार क्रमांक ०२ व ०३ हे मयत दिलीप पि. मारोती शिंदे यांचे मुलगे आहेत. मयत दिलीप पि. मारोती शिंदे यांचा मृत्यु दिनांक १७/०७/२०२३ रोजी झाला. अर्जदारांनी अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार क्रमांक ०१ ते ०३ यांना मयत दिलीप पि. मारोती शिंदे यांचे वारस असल्यावाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात सदर मयत यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे सदर मयत यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर सदर मयत यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे सदर मयत यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू सदर मयत यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २८/०१/२०२५ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून,

क. लिपीक सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली.
दिवाणी न्यायालय व. स्तर, बिलोली.


ऑफर ऑफर A/C ऑफर
म हा रा ष्ट्र जेन्टस् ब्युटी सलुन

| फेशियल | ब्लीच | हेयर स्पा |
|---|---|---|
| १) गोल्ड फेशियल 499/- | १) ऑक्सी ब्लीच 299/- | १) लोरियल 249/- |
| २) VLCC फेशियल 499/- | २) ओलिविया ब्लीच 299/- | २) मॅट्रिक्स 249/- |
| ३) डायमंड फेशियल 599/- | | |
| **डी-टॅन** | **कलर** | |
| १) O3+ 349/- | १) लोरियल 299/- | |
| २) रागा 299/ | २) मॅट्रिक्स 299/- | |
| | ३) रागा 249/- | |
| | ४) गार्नियर 199/- | |

हॉटेल मंजू समोर, वजिराबाद, नांदेड. 9822972221

कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



झाडे लावा, झाडे जगवा


## जाहीर प्रगटन

### वात्सल्यनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. नवीन नांदेड जि. नांदेड

वात्सल्यनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित नवीन सिडको या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक सन २०२४-२५ ते २०२९-३० साठीची प्रारूप मतदान यादी संस्थेचे कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व डॉ. अशोक कलंत्री यांच्या घराच्या भिंतीवर येथे लावण्यात आलेला आहे.

सदर मतदान यादीवर संस्थेच्या सभासदांपैकी कुणाचा आक्षेप असल्यास दिनांक २८/०१/२०२५ ते ०६/०२/२०२५ पर्यंत संस्थेचे अध्यक्ष/सचिव व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात आक्षेप नोंदवावेत. कृपया सदर तारखेनंतर आलेले आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची सभासदांनी नोंद घ्यावी.

संतोष के. सरकटे
निवडणूक निर्णय अधिकारी
वात्सल्यनगर सहकारी
गृहनिर्माण संस्था मर्या.
नवीन सिडको,
ता. नांदेड, जि. नांदेड
मो. ९७६७१००५५८

अध्यक्ष-सचिव
वात्सल्यनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
नवीन सिडको, ता. नांदेड, जि. नांदेड
मो. ९२२६७९९७८५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधितास या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, आम्ही खालील सही करणार ग्रामपंचायत बाचोटी ता.कंधार जि.नांदेड हद्दीतील सन दि.०७/०९/१९८७ खरेदी खत क्र. ६६०६ गट नं. २७८ ७/१२ प्रमाणे क्षेत्रफळ ०.०१.५० चौ.मी. प्लॉट नं. २६ जे की, ग्राम पंचायत नमुना नं. ८ ला नोंद आहे. लिहूनदेणार बाजीराव विठ्ठलराव लुंगारे रा. कंधार यांचेकडून लिहून घेणार श्री. गणेश व्यंकटराव पापूलवार यांचे नावे विकत घेतला आहे. प्लॉटची चतुसिमा खालील प्रमाणे आहे. पुर्वेस : रस्ता पश्चिमेस : रस्ता दक्षिणेस : व्यंकटी पांडूरंग कोतलवाड उत्तरेस : विठ्ठल बापूराव धोंडगे यांचा प्लॉट आहे. येणे प्रमाणे चतुसिमेच्या आतील वर्णनाचा प्लॉट हिंदू एकत्र कुटूंब वडिलोपार्जित मालमत्ता असतांना वडिलांच्या हातावर विकत घेतला आहे.

कै.व्यंकटी मारोती पापुलवार हे दि.२३/०८/१९९९ रोजी मयत झालेले आहेत. त्यांना तीन मुले वारस आहेत. नामे १) रामराव व्यंकटराव पापुलवार २) गणेश व्यंकटराव पापुलवार ३) नारायण व्यंकटराव पापुलवार हिंदू एकत्र कुटूंबातील वारस आहेत. कै. व्यंकटी यांच्या नावे जुने घर नं. ६५७ स्लॅब बांधकाम झालेले ३० ५० फुट १५०० चौ.फुट क्षेत्रावर बांधकाम केलेले आहे. ते वडील मयत झाल्यानंतर वडिलांच्या नावाने वडीलोपार्जीत असलेले घर श्री गणेश व्यंकटराव पापुलवार यांनी दोन भावाचे सहमती न घेता श्री गणेश व्यंकटराव पापुलवार यांनी परस्पर ग्रा. पं.नमुना नं. ८ ला नोंद करुन घेतली आहे व गट क्र. २७८ मधील प्लॉट नं. २६ व जुने घर क्र. ६५७ हे कै.व्यंकटी पापुलवार यांच्या वडिलोपार्जीत मालकीचे आहे. श्री. गणेश व्यंकटी पापुलवार यांनी ग्राम पंचायतला हाताशी धरुन आपल्या नावे नमुना नं. ८ मालमत्ता रजिस्टरला नोंद करुन घेतली आहे.

वरील मालमत्ता तीन भावामध्ये वाटणी पत्र झालेले नसून सदरील मालमत्ता गट नं.२७८ पैकी प्लॉट क्र. ३६ साईज क्षेत्र ०.०.१.५० चौ.मी. विक्री करण्याच्या इराद्यामध्ये आहे. सदरील मालमत्तेचे भावाभावांमध्ये वाटणीपत्राचे वाद विवाद चालु असून सदरील मालमत्ता कोणी खरेदी करुन घेऊ नये करीता जाहिर प्रगटन देण्यात येत आहे.

**जाहीर प्रगटन देणार**
**१) रामराव व्यंकटराव पापुलवार**
**२) नारायण व्यंकटराव पापुलवार**
**रा. बाचोटी, ता. कंधार, जि. नांदेड**
**मो.क्र.९८८१६००३०२**

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# महायुतीत मिठाचा खडा टाकणाऱ्यांना आम्हीही आमची ताकद दाखवू- आ. हेमंत पाटील

## आ. हेमंत पाटील यांचा भाजपाला इशारा

**नांदेड (प्रतिनिधी) –** आता कोणी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका स्वबळावर लढविण्याची भाषा करीत असतील व महायुतीत मिठाचा खडा टाकत असतील तर आम्हीही कमी नाहीत, आमचीही ताकद काय असते ते दाखवून देऊ असा इशारा विधानपरिषद गटनेते तथा कॅबिनेट मंत्री दर्जा असलेले आमदार हेमंत पाटील यांनी भाजपला दिला. विधानसभा निवडणुकीत शिवसेना व महायुतीला राज्यभरात मिळालेल्या प्रचंड यशाबद्दल जनतेचे आभार मानण्यासाठी शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज्यभरात आभार दौरा करीत आहेत. या दौऱ्यात नांदेड येथे दि.६ फेब्रुवारी रोजी ना. शिंदे यांची जाहीर सभा होणार आहे, अशी माहिती विधानपरिषद गटनेते तथा कॅबिनेट मंत्री दर्जा असलेले आमदार हेमंत पाटील यांनी दिली.




शिवसेनेकडून राज्यात सुरू असलेल्या आभार यात्रेची माहिती देण्यासाठी शनिवार दि. एक फेब्रुवारी रोजी हॉटेल विसावा येथे कार्यकर्ता बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

यावेळी आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव पाटील बोंढारकर, संपर्कप्रमुख दत्तात्रय पईतवार, शिवसेना जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, गंगाधर बडुरे, विनय पाटील गिरडे, माजी सनदी अधिकारी बालाजी खतगावकर, डॉ. अंकुश देवसरकर, महिला आघाडी जिल्हाप्रमुख वनमाला राठोड, गिता पुरोहित यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.

ना. पाटील म्हणाले, अन्य राजकीय पक्षासारखे 'काम सरो, वैद्य मरो' अशी शिवसेनेची भूमिका नाही. महाराष्ट्रातील जनतेने विधानसभा निवडणुकीत शिवसेनेला भरभरून दिलेल्या आशीर्वादाबद्दल महाविजयाचे शिल्पकार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आभार यात्रा राज्यात सुरू आहे. नांदेडात दि.६ फेब्रुवारी रोजी ही यात्रा पोहचत असून उपमुख्यमंत्री शिंदे यांची दुपारी १ वाजता नवीन मोंढा मार्केट कमिटी मैदानावर जाहीर सभा होणार आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्ह्यात दि. ९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान महसूल पंधरवाडा राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत १६ तालुक्यात युवकांसह शेतकरी, जनतेला विविध प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी महसूल शिबीर आयोजित केली जाणार आहेत.

यावेळी राजकीय उलथापालथीवर बोलतांना ना. पाटील यांनी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काही माजी आमदार, अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करतील, असे सांगितले. पत्रकार परिषदेला संबोधित करुन प्रत्येक कार्यकर्त्याला वेळ देऊन त्यांच्यासोबत फोटो सेशनसुद्धा करणार असल्याचे हेमंत पाटील यांनी सांगितले. यावेळी आमदार आनंदराव बोंढारकर आणि आमदार बालाजीराव कल्याणकर यांनीही दौऱ्या संदर्भात माहिती दिली.



# नाळेश्वर जवळील नव्या पुलाची अवकळा

## भुरट्या चोरट्यांनी कठड्यावरील लोखंडी पाईप केले गायब

**नांदेड (प्रतिनिधी) –** अवघ्या सहा महिन्यांपूर्वी बांधलेल्या नाळेश्वर-रहाटी मार्गावरील नाळेश्वर जवळील पुलाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. ह्या पुलाची अवस्था सध्या 'नसून खोळंबा, असून वळंबा' अशी झाली आहे. पुलाचा दोन्ही बाजुकडील सुमारे शंभर फुटापर्यंतचा भाग अक्षरशः खराब झाला आहे.

रात्रंदिवस वाळूची अवजड वाहने धावत असल्यामुळे या पुलाची वाईट अवस्था झाली आहे. या जड वाहनामुळे २०० फुटाचा रस्ता पूर्णतः खचला आहे. संबंधीत गुत्तेदाराने काम पूर्ण करण्याऐवजी रस्त्याचे काम अर्धवट स्थितीत सोडून पळ काढला आहे.

लोकप्रतिनिधींसह सार्वजनिक बांधकाम विभागानेही डोळेझाक केल्यामुळेच या पुलाला दयनिय अवस्था आली आहे. विशेष म्हणजे पुलाच्या दोन्ही बाजूने मजबूत कठडे करण्याऐवजी त्या ठिकाणी लोखंडी पाईप टाकुन थातुर-मातूर कामे केलेले आहे. परंतु पुलाला लावण्यात आलेले लोखंडी पाईप भुरट्या चोरट्यांनी गायब केले आहेत. लोकप्रतिनिधींनी जातीने लक्ष घालून संबंधीत गुत्तेदाराकडून पुलाचे काम दर्जेदार करून घ्यावे, तसेच अर्धवट रस्ता मजबूत व चांगला करुन द्यावा अशी मागणी होत आहे.

# सत्य गणपती कलशारोहण सोहळा पुढे ढकलला

**नांदेड (प्रतिनिधी) –** गुरूवर्य किसन महाराज साखरे साधकाश्रम आळंदी देवाची ब्रह्मलीन झाल्यामुळे महाराजांचे शिष्य आणि दोन्ही चिरंजीव यांनी कंधार येथील महाजन यांच्या शेतातील स्वयंभू सत्य गणपतीच्या कलशारोहणासाठी चार दिवस कीर्तन सेवा व त्याचबरोबर त्यांचे शिष्य हेंडगे महाराज ज्ञानेश्वरी वाचक होते. हे सर्व महाराज कलशारोहणाच्या कार्यक्रमासाठी येऊ न शकल्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला आहे. कार्यक्रमाची रूपरेषा लवकरच कळविण्यात येईल, असे महाजन कुटुंबियांतर्फे कळविले आहे.

# 'ग्लोबल आडगाव'ला महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्काराची चार नामांकने

## उत्कृष्ट कथेसाठी अनिलकुमार साळवे यांना नामांकन

**नांदेड (प्रतिनिधी) –** मराठवाड्यातील ग्रामीण संस्कृती, शेती आणि ग्लोबलायझेशनच्या प्रभावावर भाष्य करणाऱ्या बहुचर्चित 'ग्लोबल आडगाव' या मराठी चित्रपटाने महाराष्ट्र राज्य चित्रपट पुरस्कार २०२२ मध्ये चार नामांकने मिळवत मोठे यश मिळवले आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी साठाव्या राज्य चित्रपट पुरस्कारांची घोषणा केली असून, या चित्रपटाने विविध नामांकने पटकावली आहेत.

चित्रपटाचे लेखक व दिग्दर्शक डॉ. अनिलकुमार साळवे यांना सर्वोत्कृष्ट कथेसाठी नामांकन मिळाले आहे. तसेच सर्वोत्कृष्ट चित्रपट, उत्कृष्ट गीते (प्रशांत मडपुवार यल्गार होऊ दे) आणि उत्कृष्ट प्रथम पदार्पण अभिनेता (रोनक लांडगे) या विभागांत देखील 'ग्लोबल आडगाव'ने स्थान मिळवले आहे.



मनोज कदम (निर्माता) आणि अमृत मराठे (सह-निर्माता) यांनी साकारलेल्या या चित्रपटाने याआधीच न्यू जर्सी आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल (अमेरिका), न्यूलीन लंडन बेस्ट रायटर अवॉर्ड, इफ्फी गोवा महोत्सव, कोलकाता फिल्म फेस्टिव्हल, अजंता-एलोरा फिल्म फेस्टिव्हल, पीफ फेस्टिव्हल, यशवंत फेस्टिव्हल अशा अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील महोत्सवांमध्ये आपली चमक दाखवली आहे.

चित्रपटात सयाजी शिंदे, उषा नाडकर्णी, उपेंद्र लिमये, अनिल नगरकर, रौनक लांडगे, सिद्धी काळे, अशोक कानगुडे, अनिल राठोड, महेंद्र खिल्लारे, साहेबराव पाटील, डॉ. संजीवनी दिपके, डॉ. सिद्धार्थ तायडे यांसारख्या दिग्गज कलाकारांसह ६६५ हून अधिक कलावंतांनी भूमिका साकारल्या आहेत.

ग्रामीण जीवन, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली कोलमडणारी शेती यासारख्या गंभीर विषयांना स्पर्श करणारा 'ग्लोबल आडगाव' एप्रिल-मे २०२५ मध्ये महाराष्ट्रासह अमेरिका, दुबई आणि अन्य ठिकाणी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाने राज्य पुरस्कार नामांकन मिळवल्याने संपूर्ण मराठवाड्यात आनंदाचे वातावरण असून, 'ग्लोबल आडगाव' रुपेरी पडद्यावर कसा झळकतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कंधार येथे महर्षी मार्कण्डेय जयंती साजरी




**कंधार (प्रतिनिधी) –** येथील पद्मशाली समाज बांधवांच्या वतीने रमाकांत ताटीकोंडलवार यांच्या निवासस्थानी श्री महर्षी मार्कण्डेय यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी कंधार-लोहा पद्मशाली समाजाचे अध्यक्ष बालाजी इरमलवार, उपाध्यक्ष पांडुरंग गुरूपवार, युवा अध्यक्ष गजानन बोड्डावार, प्रा. मारोती चामलवार, श्रीकांत भंडारवार, गोविंद झुंझरवार, माधव झुंझूरवार, ज्ञानोबा वंगलवार, व्यंकटेश झुंझरवार, श्याम झुंझरवार, बालाजी दारनलवार, धनंजय गुंडाळे, चंद्रकांत पोठेवार, सुर्यकांत झुंझरवार, माधव उडतेवार, तुकाराम पोटेवार, चंद्रकांत बोड्डावार, किशन झुंझरवार, जयप्रकाश ताटीकोंडलवार आदीं उपस्थित होते.




**नांदेड :** महर्षी मार्कण्डेय जयंतीनिमित्त शहरातून दत्तनगर येथील महर्षी मार्कण्डेय मंदिरापासून शोभायात्रा काढण्यात आली. (छाया : करणसिंह बैस)

# तोतया पोलिसांनी जेष्ठ नागरिकाला घातला एक लाखाचा गंडा; नांदेड शहरातील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दातार चौक येथे एका ज्येष्ठ नागरिकास आम्ही पोलीस आहोत अशी बतावणी करून त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन आणि अंगठी असा एक लाख पाच हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास करून फसवणूक केली. ही घटना ३१ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास घडली.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दातार चौक येथे पावडेवाडी येथील कृष्णानगरी भागात राहणारे बालाजी धोंडीबा मच्छरलावार (वय ६५) हे कामानिमित्त आले होते. सकाळी नऊ ते साडेनऊच्या सुमारास पोलिसाचे बनावट ओळखपत्र दाखवून आम्ही पोलिस आहोत अशी अनोळखी दोघांनी बतावणी करून त्यांच्या गळ्यातील चैन आणि हातातील अंगठी काढून पुडीत बांधून ठेवा असे सांगून त्यांची नजर चुकवून सोन्याची चैन आणि अंगठी आपल्याजवळ ठेवून दुसऱ्या पुडीमध्ये वाळूचे खडे भरून त्यांच्या हातात देऊन दुचाकीवरून तोतया पोलीस पसार झाले. थोड्यावेळाने पुडी उघडून पाहतात तर त्यात वाळूचे खडे आढळून आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी हा प्रकार आपल्या घरी सांगितला. त्यानंतर बालाजी मच्छरलावार यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तोतया दोन पोलिसांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक गावंडे करत आहेत.

# चंदर हातागळे यांचे निधन

**भोकर (प्रतिनिधी) –** जामदरी येथील माजी ग्रा. पं. सदस्य चंदर मरीबा हातागळे (वय ८२) यांचे दि. १ फेब्रुवारी रोजी निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातू पणतू असा परिवार आहे. शिक्षक दिगंबर हातागळे यांचे वडील तर पत्रकार एल.ए.हिरे यांचे ते मेहुणे होत.

# पोलीस निरीक्षक आयलानेविरुद्ध न्यायालयाच्या आदेशावरून गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी) –** लोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्याविरुद्ध जिल्हा न्यायाधीशांच्या आदेशानुसार लोहा न्यायालयात गुन्हा दाखल करण्याचे तसेच माधव धोंडे यांचा जबाबही नोंदविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार गुन्हा दाखल करून चार्जशीट झाले आहे आणि कोर्टात त्याचा ट्रायल सुरू झालेले आहे.

आरसीसी नंबर ५/२०२५ ने केस चालू झाली आहे. या व्यतिरिक्त उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र. २०११ / २०२४ दाखल केली आहे. ही याचिका करण साधू वडजे या कार्यकर्त्याच्या माध्यमातून ५० लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळावी आणि त्यांची एसआयटी कडून चौकशी व्हावी यासाठी औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेली आहे. त्या याचिकेमध्ये सुद्धा उच्च न्यायालयाने पोलीस निरीक्षक नागनाथ आयलाने आणि पोलीस उपनिरीक्षक पाटील या दोघांना आणि महाराष्ट्र सरकारला नोटीस बजावली आहे.

विधानसभा मतमोजणीच्या दिवशी लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातून प्रा. मनोहर धोंडे यांनी निवडणूक लढविली होती. परंतु त्यांना त्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. काही समाजकंटकांनी त्यांच्या कार्यालयात घुसून दगडफेक करून कार्यकर्त्यांना जबर मारहाण केली होती. यावेळी घटनास्थळाला पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनीही भेट देऊन योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु पोलीस निरीक्षकांनी यात स्वारस्य दाखवले नसल्याने प्रा. मनोहर धोंडे व त्यांचे कार्यकर्ते न्यायालयात दाद मागण्यासाठी गेले होते. अखेर न्यायालयाने या प्रकरणात दखल घेऊन गुन्हा दाखल केला आहे.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com